CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

कर्मयोगी गाडगेबाबांचे जीवन तत्वज्ञान

लेखक
प्रा. रघुनाथ कडवे

अमोल प्रकाशन, नागपूर

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

कर्मयोगी गाडगेबाबांचे जीवन तत्वज्ञान

लेखक
प्रा. रघुनाथ कडवे
संपादक 'श्रीगुरुदेव'

✸

प्रकाशन तिथी
२३ फेब्रुवारी २००५
गाडगेबाबा जयंती

✸

अमोल प्रकाशन, नागपूर.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

प्रकाशक :

अमोल कडवे,

अमोल प्रकाशन

२०६ बी उज्ज्वल, राहाटे कॉलनी,

वर्धा रोड, नागपूर

☎: २५६२५२१

(सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन)

*

प्रथमावृत्ती २००५

*

अक्षर जुळवणी :

गुरुदेव मुद्रणालय,

महाल नागपूर.

*

किंमत २० रुपये

*

मुद्रक :

जयकृष्णा ऑफसेट वर्क्स

कापसे चौक, गरोबा मैदान,

नागपूर. ☎ : २७६५३४८

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

कर्मयोगी गाडगेबाबांच्या
मातोश्री सखुबाई
व
धर्मपत्नी कुंताबाई
यांच्या पावन स्मृतीस
सविनय अर्पण.

-अमोल कडवे
प्रकाशक

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

लेखकाचे दोन शब्द

वाचको हो !

कर्मयोगी गाडगेबाबांचे जीवन तत्वज्ञान हे लहानसे पुस्तक आपल्या हाती देताना मला आनंद होत आहे पण आपणापैकी अनेकांना वाटेल की गाडगेबाबा हे तर एक संत होते, एक समाज सुधारक होते, वैराग्यमूर्ती होते, ते काही तत्वज्ञानी नव्हते. परंतु प्रस्तुत पुस्तक वाचल्यानंतर मात्र गाडगेबाबांच्या लहान लहान वाक्यात भारतीय तत्वज्ञानाचे अनेक पैलू आहेत असे लक्षात येईल. 'बहुजनाला जमाखर्च माहीत नाही' 'या विश्वात स्त्री-पुरुष ह्या दोनच जाती आहेत' 'अस्वच्छता हे सर्व रोगांचे मूळ आहे' 'सर्व जातीच्या मुलांसाठी हे वेद-उपनिषदाचे, गीता-भागवताचे दरवाजे उघडे करा' 'कुणी माझा शिष्य नाही' 'धनगरांची मेंढरं बनू नका' अशा साध्या सोप्या वाक्यात भारतीय जीवन तत्वज्ञान आहे.

गाडगेबाबा शालेय दृष्टीने अशिक्षित होते, अडाणी होते, त्यांना स्वतःची सही करता येत नव्हती. परंतु त्यांचं जीवन पाहिलं म्हणजे गाडगेबाबा महाज्ञानी होते, मोठे तत्वज्ञानी होते. विश्व नावाचं पुस्तक त्यांनी अतिशय बारकाईनं अभ्यासले होते. हे आपल्या लक्षात येते. जे पाहिलं आणि अभ्यासलं तेच त्यांनी जगाला सांगितलं. तेच सूत्रबद्ध पद्धतीनं मांडण्याचा हा अल्पबुद्धीचा प्रयत्न आहे. कुणाला वाटते गाडगेबाबा गांधीवाद सांगतात, कुणाला वाटते समाजवाद समजावून देतात, कुणाला वाटते गाडगेबाबा आंबेडकरांचे विचार सांगतात. कुणाला त्यांच्या विचारसरणीत मार्क्सवाद दिसतो तर कुणाला मानवतावाद दिसतो. धर्माभिमान्यांना वाटते की आपल्याच धर्माचे सार सांगत आहे.

दुसऱ्याच्या रक्तावर जगणाऱ्यांना मात्र गाडगेबाबांचे हे तत्वज्ञान आवडत नाही. त्यांचं नाव घ्यायला, त्यांना संत मालिकेत उभे करायलाही ते तयार नाहीत, नसोत ना ते बिचारे. त्यांना त्यांचं पाहू द्या. आपण परिवर्तनाची दिशा ओळखा आणि वाचक हो ! आपण गाडगेबाबाच्या तत्वज्ञानातलं एखादं तरी सूत्र मनात रुजवा आणि परिवर्तन काळाचे पाईक व्हा. एवढ्याचसाठी या पुस्तकाचे प्रयोजन आहे.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

गाडगेबाबांना मी एकदाच पाहिलं. १९५४ साली ते आमच्या धर्तीमूर्ती गावात आले होते. त्या आमच्या गावच्या नदीच्या पात्रात त्यांचं दूरूनच दर्शन झालं. त्यांचे कीर्तन ऐकण्याचं भाग्य मला मात्र लाभलं नाही पण त्यांच्या जीवनांचा अभ्यास करण्याचा, त्यांच्या धर्मशाळा पाहण्याचा, दापुऱ्याच्या शिवारातल्या झगडी शेताचं दर्शन घेण्याचा अन् त्यांच्या अनेक टाळकऱ्यांशी व गाडगेबाबा मिशनच्या कार्यकर्त्यांशी भेटण्याचा व बोलण्याचा योग आला, गाडगेबाबांचं चरित्र लिहिण्याचं भाग्य लाभलं व इतरांनी गाडगेबाबांच्या जीवनावर लिहिलेलं अभ्यासायला मिळालं. त्यातून हे नवनीत आपल्यासमोर ठेवित आहे. ज्यांनी ज्यांनी या कामात मला सहयोग दिला व ज्यांच्या पुस्तकांतून मी उतारे घेतले त्या सर्व लेखक-प्रकाशकांचे सविनय आभार.

नागपूर —प्रा. रघुनाथ कडवे

५ जानेवारी २००५,

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

अनुक्रम

१. देव पाहण्याची वस्तू नाही.
२. कथेच्या नव्हे तत्वाच्या मागे लागा.
३. देव विकत मिळत नाही.
४. मूर्तिपूजेला गौण स्थान आहे.
५. जगात देव आहे.
६. कर्तव्यशूर माणसंच देव आहेत.
७. गणपती बसवनं देवाची भक्ती नाही.
८. देवाचं भजन केल्याने मनुष्य देव होतो.
९. माणसाचं धन कीर्ती आहे.
१०. विद्या मोठं धन आहे.
११. देव धन देत नाही.
१२. जमाखर्च ठेवलाच पाहिजे.
१३. देवाचेच देवाला देतो.
१४. देव-देवता स्वप्नात येत नाही.
१५. या विश्वात फक्त दोनच जाती आहेत.
१६. स्वच्छता आहे तिथंच देवाचं राज्य आहे.
१७. भजन आहे त्या घरात देवाची राखण आहे.
१८. सर्व मुलं सारखीच असतात.
१९. माझा कुणी शिष्य नाही.
२०. धनगराची मेंढरं बनू नका.
२१. जीवंत असेपर्यंत आईवडीलांची सेवा करा.
२२. देव-देवतास नवस करू नका.
२३. दया हाच धर्म
२४. बायांचा देव घरात आहे.
२५. देवाच्या मूर्तीसमोर पैसे-फळं ठेवू नका.
२६. दुर्व्यसनापासून दूर राहा.
२७. इंद्रिय नाही मन दंडलं पाहिजे.
२८. कुष्ठरोग्यांची सेवा करा.
२९. कोणतेही काम कमी दर्जाचे नाही.
३०. त्यागापाशीच त्याग येतो.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

१. देव पाहण्याची वस्तू नाही

गाडगेबाबांच्या तत्वज्ञानाचे प्रथम सूत्र त्यांच्या कीर्तनातील विचारात आहे. देव कोणं पाह्यला नाही ...... ज्याले देव म्हणतत्, परमेश्वर म्हणतत् की ज्याचे हुकूमानं हे सर्व ब्रह्मांड चाललं तो कोणी पाहिला नाही, देव कोणाले दिसणार नाही, देव पाह्याची वस्तू नाही.''

गाडगेबाबांच्या तत्वज्ञानाचे हे सूत्र हिंदुधर्म, इस्लाम धर्म व ख्रिश्चन धर्मात आढळते. गाडगेबाबांनी सांगितलेले सूत्र सर्वच धर्माचे सार आहे असे म्हटले तर ते चूक होईल असे म्हणता यायचे नाही. जी वस्तू नाही ती दिसत नाही. ती आकार घेतच नाही. तिची घडण होतच नाही. स्थूल नेत्र दृष्टीला ती दिसणे शक्यच नाही. ज्यावर सूर्याची किरण पडतात व तेथून परावर्तित होवून पाहणाऱ्याच्या डोळ्यात शिरतात तेव्हाच ती वस्तू दिसत असते. हे भौतिक शास्त्राचे सिद्धांत येथे लागू पडते म्हणून गाडगेबाबा म्हणत की ईश्वर ही वस्तू नसल्यामुळे ती कुणालाच दिसणार नाही. कोणी पाहू शकणार नाही.

याचा अर्थ गाडगेबाबांना ईश्वर या विश्वात नाही असे म्हणायचे आहे असा समज होण्याचा संभव आहे. गाडगेबाबा हे निरीश्वरवादी होते, नास्तिक विचाराचे अन् नास्तिक वृत्तीचे होते असेही वाटायला लागेल परंतु गाडगेबाबा हे निरीश्वरवादी नव्हते, नास्तिक विचाराचेही नव्हते हे त्यांच्या जीवन चरित्रावरून सहजपणे दिसून येते. त्यांचा देवावर विश्वास होता, पण त्यांचा देव हा निर्गुण आहे, निराकार आहे, अदृश्य आहे त्यांनी प्रस्तुत विचारसूत्रात 'देव' हा शब्द 'ईश्वर' 'परमेश्वर' या अर्थाने वापरलेला आहे. सगुण वा साकार अर्थाने नव्हे हे ध्यानात घेणे अत्यावश्यक आहे.

● ● ●

२. कथेच्या नव्हे तत्वाच्या मागे लागा

गाडगेबाबांचे प्रस्तुत सूत्र हे परंपरावादी, पुराणवादी विचार सरणीच्या लोकांना पटणार नाही कारण परंपरावादी लोकांच्या मनात ब्रह्म, विष्णु, महेश आहेत. लक्ष्मी-पार्वती त्यांच्या मेंदुत

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

स्थिर झालेल्या आहेत. त्यांच्या भोवती अनेक कथांचे व आख्यायिकांचे वलय आहे. त्या कथा व आख्यायिका त्यांना खऱ्याच वाटतात. वस्तुतः धर्माची काही सूत्रे, काही तत्वे लोकमानसाच्या मनात रुजावी म्हणून कथा सांगण्यात आल्या. त्या कथा इतक्या प्रमाणात प्रचलित झाल्या की त्या कथांच्या मागचे सूत्र वा तत्व मागे पडले आणि कथाच पुढे आल्या, फक्त कथाच ध्यानात राहिल्या व तत्वांचा विसर पडला. गाडगेबाबांच्या जीवनात कथेला स्थान नाही तर तत्वाला स्थान आहे. गाडगेबाबांच्या मते यापैकी अनेक कथा कल्पोकल्पित आहेत. आपले पोट भरण्यासाठी काही लोकांनी ह्या पुराणकथा प्रसारित केलेल्या आहेत. त्यामुळेच गाडगेबाबा अशा कथांना कीर्तनातून विरोध करतात. त्यांचे पितळ उघडे पाडतात. सत्यनारायण कथेविषयी ते म्हणतात...सत्यनारायण देवाची भक्ती नाही. सत्यनारायण कोण करते ? लोभी लोक, मुलगा नाही, सत्यनारायण पाव, गाडी नाही–सत्यनारायण करु.

पैसा हातात मिळत नाही–सत्यनारायण करु. ते जागा मले कधी मिळेल-- सत्यनारायण करेल. लोभी लोक ! सत्यनारायण ? देवाची भक्ती नाही. सत्यनारायणाच्या पोथीमधे असं आहे की, साधुवाण्यानं परसाद नाही घेतला, अन् सत्यनारायण नाही केला, त्याची करोडो रुपयाची नौका पाण्यात बुडा ऽऽऽ ली ! अडीच रुपयाचा सत्यनारायण केला अन् परसाद वाटला, परसाद घेतला अन् करोडो रुपयाची नौका बुडाली ती वर... आऽऽऽ ली ! आं ?

वर आ ऽऽ ली !

नाही, नाही, हे खरं नाही ! ज्या साली लढाई झाली, त्यासाली समुद्रात एक एक आगबोट पन्नास पन्नास कोट रुपयाची पार तळाला गेली. पत्ता नाही. अशा किती आगबोटी बुडाल्या. सत्यनारायण करणाऱ्या महाराजाले म्हणाव अडीच रुपये घेऊन कशाला एवढी बडबड करता–अडीच लाख रुपये घ्या– अडीच कोट रुपये घ्या– समुद्राच्या किनाऱ्यावर एक सत्यनारायण करा अन् एक आगबोट आणा वर जमेल का ?

ना ऽ ऽ ऽ ही

.यातून समाजाला प्रबोधन करताना गाडगेबाबा अशा सत्यनारायण करणाऱ्या पंड्या–पुजाऱ्याच्या जाळ्यात न फसता खोट्या कल्पो– कल्पित कथेच्या मागे लागू नका, तत्वाच्या मागे लागा असा हितोपदेश करतात. ● ● ●

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

३. देव देवळात नाही

गाडगेबाबांचा देव देवळात नव्हता, हजरत मैजिदीत नाही. ते नेहमी म्हणायचे.

नही मेहजिदमें नही देवलमें।
हिरा खोया कचरोमें।

गाडगेबाबाने सत्य सांगत असताना देवळात देव नाही तर देवाची मूर्ती आहे असे सांगितले आणि ही मूर्ती कुठल्यातरी मूर्तीकाराने तयार केलेली आहे. कुणी सोन्याची केली असेल, कुणी चांदीची, कुणी पितळेची केली असेल, कुणी दगडाची कोरीव मूर्ती केली असेल. ती मूर्ती देवळाच्या विश्वस्तांनी विकत आणलेली असते. त्यासाठी दहा-वीस हजारच नव्हे तर काही लाख रुपयेही दिले असतात ही वास्तविकता आहे. गाडगेबाबा म्हणूनच म्हणतात की तो देव नाही ती देवाची विकत आणलेली मूर्ती आहे.

गाडगेबाबा कीर्तनातून प्रबोधन करीत असताना पोटतिडकीने लोकांना सत्य समजावून सांगत. देव विकत मिळत नसतो, बाजारात जावून मेथीची भाजी, कांदे-बटाटा आपण खरेदी करतो आणि घरी आणतो तसला व्यवहार करून देव आपल्या घरी आणून ठेवणार असू तर हा विचारच चुकीचा आहे.

● ● ●

४. मूर्तीपूजेला गौण स्थान आहे

गाडगेबाबा लोकांना विचारत की तुम्ही विकत आणलेल्या देवाला आंघोळ करता येते काय?त्यास धोतर नेसता येते काय ? त्याचे पुढे निवद ठेवला तर तो खातो काय ? तुमच्या देवाचा देवळापुरता तरी आता उजेड पडते का ? श्रोते अशा प्रश्नांना उत्तर देताना नकारार्थी उत्तर देतात तेव्हा देव देवळात नाही, कुठे आहे ? या जगात देव आहे असे गाडगेबाबा स्वतःच म्हणतात. यावरुन गाडगेबाबांना मूर्तिपूजा आवडत नव्हती असे दिसून येते. त्यांनी मूर्तिपूजा करण्याचा हितोपदेश कधीच कुणास केला नाही. स्वतः कधीही पूजा अर्चा करताना ते दिसले नाही. ध्यान धारणा, संध्या, प्राणायाम करताना कुणाला आढळले नाही. जपजाप्य, नेमधर्म, व्रतवैकल्य करताना त्याना कोणी पाहिले नाही. माळा जपताना वा

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

योगमार्गाचा साधना करताना कोणास आढळले नाही. यावरून त्यांच्या तत्वज्ञानात अशा गोष्टींना फारसे स्थान नाही असेच म्हणणे क्रमप्राप्त आहे. परंतु जे कोणी अशी साधना करीत असेल त्यांनी त्यांच्या पद्धतीने कराव्यात, त्यांनी त्यांचा विचार करावा.

गाडगेबाबानं ऋणमोचनला लक्ष्मीनारायणाचं छोटसं मंदीर बांधले, नाशिकला दत्तमंदिर बांधले, मूर्तिजापूरला हनुमंताची मूर्ती बसविली आपल्या काही सहकाऱ्यांच्या आग्रहास्तव. स्वत:हून गाडगेबाबाने मूर्ती अन् मंदीर याला फारसं स्थान आपल्या जीवनात दिलं नाही, कैकाडी महाराजाने व्रत केलं, राष्ट्रसंत तुकडोजी महाराजानं सालबर्डीला यज्ञ केला. गाडगेबाबा तिथं उपस्थित होते परंतु त्यांनी त्यास विशेष महत्व दिलं नाही. ही वस्तुस्थिती आहे.

● ● ●

५. जगात देव आहे

देव हा देवळातच आहे, मसजिदीतच आहे, गिरीजा घरातच आहे, विहारातच आहे असे समजण्याचे कारण नाही. जो पूजास्थानात आहे तोच पूजा स्थानाच्या बाहेर सुद्धा आहे, आपण जिथं जातो तिथं देव आहेच याचे भान असू द्यावे. आपण जे बोलतो ते देव ऐकतो, आपण जे करतो ते देव पाहतो याची जाण प्रत्येक व्यक्तीने ठेवावी यासाठी गाडगेबाबा सर्व लोकांना जाहीरपणे सांगत की जगात देव आहे.

देव चराचरात आहे, देव अणुरेणूत आहे, देव काष्ठीपाषाणी सर्वत्र आहे. हेच आजवरच्या सर्व संतांनी मानवजातीला सांगितलं; तेच गाडगेबाबा सुद्धा सांगत होते. माणसांना पूजास्थानाचे बाहेर अंध, पंगू, गोरगरीब माणसं दिसतात त्यात देव पाहण्याचा आग्रह गाडगेबाबा धरतात. निराधार व्यक्ती आहेत. रोगग्रस्त असलेल्या व्यक्ती आहेत त्यांचेकडे देव या दृष्टीने पाहण्याची गरज आहे असे गाडगेबाबा प्रतिपादन करतात. दगडाला शेंदूर लावले वा दगडाची मूर्ती केली तर आपल्या भावना जागृत होतात आणि आपण त्यास देव म्हणतो. मग या अंध-अपंग-रंजल्या-गांजल्या व्यक्ती दिसताच आपल्या भावना जागृत झाल्याच पाहिजे आणि त्यांच्यात देवाचं देवत्व पाहिलं पाहिजे असेच गाडगेबाबा सांगायचे. 'देवळीचा देव मेला अंतरीचा जागवा रे' यां संत तुकारामाच्या

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

विचारधाराचे गाडगेबाबा समर्थन करतात, 'जे जे भेटे भूत। ते ते मानिजे भगवंत' या संत ज्ञानेश्वराच्या जीवन दृष्टीचा पुनरउच्चार गाडगेबाबाने केलेला आहे नव्हे त्याचे प्रात्यक्षिकच आपल्या जीवनात त्यांनी करून दाखविले आहे. जगात देव आहे याचे भान ठेवून आपण जीवन जगलो तर पाप आपल्या हातून घडणारच नाही आणि पावित्र्याचा मार्ग आपल्याला पदोपदी दिसायला लागेल. मन प्रसन्न राहील. मन प्रसन्न असले, वातावरण प्रसन्न असले की त्या वातावरणातील चैतन्य जागृत राहाते आणि आनंदाच्या लहरी मागून लहरी येत असतात, त्याचा अनुभवच येतो.

● ● ●

६. कर्तव्यशूर माणसंच देव आहेत

भारतीय संस्कृतीत कर्तव्यशूर माणसाला देव म्हटलं आहे. जे नीतिमान आहेत ते देव आहेत. जे क्रांती करतात ते देव आहेत. जे क्रांती कार्याची स्फूर्ति देतात यांनाच देव म्हटले जाते. जो समाजाला आपले सर्वस्व देतो तोच देव होतो. या संदर्भात गाडगेबाबांनी खोलवर विचार केलेला होता. ते शिकलेले नव्हते पण ते शहाणे होते, ज्ञानी होते. ते थोर विचारवंत होते. आत्मानुभूती पारंपारिक विचारानुसार नसतील परंतु त्यांनी समाज निरीक्षणातून सूक्ष्म दृष्टी प्राप्त केली होती हे नाकारता येत नाही. म्हणूनच ते कीर्तनात म्हणायचे– "ब्रिटीस सरकारने आपल्यावर एक अरिष्ट आणलं होत. मग सत्याग्रह केला की नाही लोकाइनं ? हो ऽऽऽ य! देवळातले देव आले होते का मदत कराले? बांद्रयाचे राम आले, दादरचे इठोबा, पाह्यले होते का ? ना ऽ ही! मग कोनं सत्याग्रह केला ? माणसानं ! कोण केला ? माणसानं?! अन् मंग कोण चले जाव म्हटलं ? गांधीजीनं ऽऽ ! मग गांधीजीला देव म्हणा की शेकडो वर्ष राज्य केलं अन् एका शब्दात ज्यानं म्हटलं की तुम चले जाव गेले का राहिले ? गे ऽऽऽ ले ! गांधीजीले देव म्हणा."

दीन–दलितासाठी रात्रंदिवस झटणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना गाडगेबाबा देव म्हणत असत. गाडगेबाबांच्या कीर्तनात अनेकदा बाबासाहेब येवून बसत तेव्हा गाडगेबाबा लोकांना कीर्तनाच्या ओघात बाबासाहेबाकडे पाहात सांगत 'ते आमचे देव तिथे बसलेले आहेत.'

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

भाऊसाहेब डॉ. पंजाबराव देशमुख यांना गाडगेबाबा 'शेतकऱ्यांचे देव' म्हणत. भाऊसाहेब जेव्हा कृषिमंत्री पहिल्यांदा झाले असता अमरावतीत आले तेव्हा अमरावतीच्या सध्याच्या पंचवटी चौकात गाडगेबाबा कुठून तरी न कळत आले अन् त्यांच्या पायावर डोकचं त्यांनी ठेवलं. 'हे आमचे देव आहेत' असं लोकांना सांगते झाले. कीर्तनातून शिक्षण महर्षि भाऊसाहेबांचा देव म्हणूनच गौरव करीत. साताऱ्याकडील शिक्षणाची गंगा गोरगरीबाच्या दारात आणणाऱ्या कर्मवीर भाऊराव पाटलांना गाडगेबाबा देवच म्हणत.

गाडगेबाबांचा देव वाघोबा, नागोबा, म्हसोबा नव्हता गाडगे बाबांचा देव कर्तव्यशूर माणूसच होता. सगुणदेवाचे रुपानं असे देव गाडगेबाबांना दिसत होते. दगड धोंड्याच्या देवाना पूजण्यापेक्षा अशा जीवंत देवांची पूजा करा, त्यांच्या कार्याचा गौरव करा, त्यांच्या व्यक्तिमत्वाचा सत्कार करा असेच गाडगेबाबांना जनमानसाला सांगायचे होते.

● ● ●

७. गणपती बसवनं देवाची भक्ती नाही

आपण दरवर्षी गणपती आपल्या घरी बसवतो किंवा सार्वजनिक ठिकाणी गणेशाची मूर्ती बसवतो, तिला सुंदर सजवतो, सकाळ–सायंकाळ आरती दहा दिवस करीत असतो. आपण गणपतीची मोठी भक्ती केली असा आवही आणतो अन् अनंतचतुर्दशीला तलावात, नदीत वा विहीरीत ती मूर्ती शिरवून टाकतो.

गाडगेबाबा म्हणत की गणपती बसोवनं देवाची भक्ती नाही... हे एक रुढी पडून गेली... रुढी..... काय पडली ?

रु ऽऽऽ ढी !

हा गणपती बसोवनं देवाची भक्ती नाही. ज्या वक्ती गणपतीले आणता--बँड लावता, भजन लावता अन् वाजवत वाजवत आणता.

मोरया ...... मोरया........ मो ऽऽऽ रया !

आणून सिंहासनावर बसवता अन् त्याची पूजा करता. निवद, मोदक, आरत्या, शेवटच्या रोजी उठवता का नाही ? हो ऽऽऽ !

मग त्याले कुठी घेता ?

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

डोक्यावऽऽऽर ! बोला ? डोक्यावऽऽऽर !
अन् मग कुकडे लांबवता ?
मोरया ...... मोरया ...... मोर ऽऽ या !

गाडगेबाबा हावभाव करीत गळ्याला हात लावून म्हणत 'एवढ्या पाण्यात- मोरया ! चले जाव. हे देवाची भक्ती नाही. ज्याची एवढी शोभा केली ज्याच्या आरत्या केल्या. अन् त्याले पाण्यात बुडवून मारता? तुमच्यावर कधी खटला भरला तर फौजदारी होते. ही देवाची भक्ती नाही.' असे परोपरीने गाडगेबाबा जनमानसाला प्रबोधन करीत. केवळ रुढ्यांच्या मागे लागू नका तर खरा देव ओळखा, खऱ्या भक्तीची ओळख करून घ्या असेच त्यांचे सांगणे होते.

● ● ●

८. देवाचं भजन केल्याने मनुष्य देव होतो

गाडगेबाबा दिवसा गावभर झाडू मारत, स्वच्छता करीत आणि रात्रौभजन करीत, कीर्तन करीत.त्यांना लहानपणापासून भजनाचा छंद होता. अमरावतीचे श्री स. सी. बानुबाकोडे यांनी १९३८ साली गाडगेबाबाचे अल्पचरित्र लिहिले होते त्यात ते लिहितात- 'डेबुजींच्या मनाचा ओढा बालपणापासूनच ईश्वरभक्तीकडे फार होता. गावाचे बाहेर पूर्णानदीचे काठी दुपारी आपली गुरे झाडांच्या सावलीत बसवून डेबुजींनी रेतीत महादेवाची पिंडी करावी; तीवर रानवृक्षांची मिळतील ती फुले तोडून वाहावी, जवळ असलेल्या न्याहारातील शिळ्या भाकरीचा तुकडा नेवेद्य म्हणून दाखवावा; व हातात दगड घेऊन किंवा नुसत्याच टाळ्या पिटून " नारायण हरी जय जय रामकृष्ण हरी" म्हणत मोठमोठ्याने भजन करावे; असा त्यांचा नित्यक्रम असे. कधी कधी या भजन प्रेमानंदात ते इतके गुंग होऊन जात असत की, या अवधीत त्यांची गुरे दुसऱ्याच्या शेतात शिरल्यामुळे त्या शेतकऱ्याने तेथे येऊन डेबूजींना तंबी देईपर्यंत डेबूजी भानावर येत नसत."

गाडगेबाबांना भजनाचा अतिशय नाद वयाच्या १४-१५ वर्षीच होता या विषयी सांगताना श्री बानुबाकोडे गुरुजी म्हणतात-' पुढे पुढे त्यांचा हा नाद इतका वाढला की दिवसभर जंगलात गुरे चारून सायंकाळी घरी आल्यावर गुरे गोठ्यात बांधून त्यांच्या चाऱ्या पाण्याची व्यवस्था करून द्यावी; आणि मग स्वतःच्या खाण्यापिण्याची पर्वा न करिता घरातून बाहेर पडून व आपले गुराखी

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

सवंगडी जमवून, अगदी एकांत व पडीत जागेत भजनानंदाचा मनमुराद आस्वाद अनुभवावा, या वेळची त्यांच्या भजनाची सामुग्री टिनपत्र्यांच्या झांजा आणि रॉकेलच्या रिकाम्या डब्यांचे ढोल ही होय. या नादात रात्रीचा बराच काल व्यतीत होत असल्यामुळे घरी जाण्यास त्यांना उशीर होत असे, व त्यामुळे कधी कधी त्यांना रात्रीचे जेवणही मिळत नसे. इतकेच नव्हे तर मामामामीच्या शिव्या व कधी कधी मारही खावा लागत असे परंतु याची डेबूजीनी कधीच पर्वा केली नाही'' इतके डेबूजी भजनाचा आनंद लुटीत होते. ही बालपणाची सवय त्यांना जन्मभर टिकविली आणि भजन हीच देवाची भक्ती आहे असा मनोमन ध्यास धरला.

''गाडगेबाबानं गृहत्याग केल्यानंतर एकतारी घेवून भजन करु लागले व भजनात तासचे तास गुंग होऊन जाऊ लागले. प्रवासात, जंगलात अगर मनास समाधान वाटेल त्या ठिकाणी बसून ते भजन करू लागत व आठ–दहा तास सारखे भजन करीत. एकाद्या गावास मुक्कामास गेले तर तेथेही भजन करीत. यामुळे परमेश्वर चिंतनात त्यांचा बहुतेक काळ जाऊ लागले'' असे एक चरित्रकार श्री पांडुरंग कवडे यांनी १९४३ साली लिहिलेल्या चरित्रात लिहिले आहे.

भजन केल्याने मनुष्य देव होतो अशी गाडगेबाबांची मनोधारणा होती. तुकोबारायाच्या अभंगावर त्यांचा भारी विश्वास. अभंगावर ते म्हणायचे 'तुकाराम महाराज–सत्पुरुष, जगाला उपदेश करतात– चार वेद केले ब्रह्मदेवानं, पाचव्या वेदाची वाणी केली तुकोबारायानं, ते महान पुरुष जगाला उपदेश करतात की, बाबांनो, माणसाच्या जन्मात आल्यावर आपण काय काय करावं ? पैसा कमवावा का बायकापोरं पोसूनच मरावं, का सग्यासोयऱ्यांच्या, गणगोतांचा मेळ करून ह्यांच्यातच आयुष्य घालवावं ? तरी माणसाच्या जन्मात येऊन जो देवाचं भजन करील–

तुकोबाराय म्हणतत् – तो देव होईल देव !

तुकोबारायाचा स्वतःचा पुरावा आहे–

देव पाहायासी ...... गेलो ऽऽ लो ऽऽअ
अन् तेथे देव होवोनी ...... ठेलो ॥

तुकोबा म्हणत– मी शेतकरी, शेतकऱ्याचा मुलगा, मले ईश्वराच्या भक्तीचं काय ज्ञान ? संताचे पुरावे ऐकून भक्तिमार्गाले लागलो. देव कसा असेल?

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

'देव पाहावया.... गे ऽऽ लो ऽऽ ! देव नाही दिसला.'
तुकोबाराया म्हणत, 'मीच देव झालो'.

भजन केल्याने मनुष्यच देव होतो असे गाडगेबाबा पुन्हा पुन्हा लोकांना सांगत. आज गावोगावी भजन करणारे लोक आहेत, शहरोशहरी संगीताच्या धूनमध्ये भजन म्हणणारे संगीततज्ञ आहेत. कव्वाली म्हणणारे, गझल म्हणणारे आहेत, अभंग म्हणणारे हजारो वारकरी आहेत मग हे भजन म्हणणारे सारेच देव झालेत काय ? असा सहजपणे प्रश्न आपल्यासमोर उभा राहतो. यास नकारार्थी उत्तर येते. याचा अर्थ असा की गाडगेबाबांची भजनाची व्याख्या, भजनाची व्याप्ती विशाल असली पाहिजे. गाडगेबाबा भजन-कीर्तन करता करता आपल्यासाठी देव झाले, तुकोबाराय देव झाले, तुकडोजी महाराज देव झाले. ज्ञानदेव-नामदेव भजन गाता गाता देव झाले. पण आजकाल दोन चार भजन म्हटली, स्वर तालात सुंदर पद्धतीने भजन गायिली की गाणारा देव होणे शक्य नाही.

गाडगेबाबांचे भजनाचा भाव फार विशाल होता. भावार्थ फार खोलवर होता. संतांचे भजन गात असताना तन-मन एवढे एकाग्र व्हावे की आपल्या स्वानंदात आपलेपणाचे भान हरावे असे भजन आपण नित्यनियमाने करीत असू आणि आपल्या आत्मानंदात रात्रंदिवस राहात असू तर आपणास देवासारखे लोक समजायला लागतील. दुसरे असे की मुखाने भजन गात असू, नामस्मरण करीत असू तेव्हा हात रिकामे राहात कामा नये, आपण केवळ टाळ्याचं पिटत राहू तर आपण देव होणार नाही. आपले हात जनसेवेचे निष्काम भावनेने काम करीत असतील तरच भजन करणारा देव होईल असा गाडगेबाबांना भजनाचा अर्थ अभिप्रेत आहे. गाडगेबाबा कधीच कुणाला रिकामे दिसले नाही. त्यांचे हात सतत कामचं करीत होते. त्यांनी आयुष्यात प्रचंड कार्य उभारले, प्रचंड जनसेवेचे कार्य केले. लाखो लोकांशी या गाडगेबाबानं संपर्क साधला, कितीतरी थोर थोर लोक त्यांच्यापुढे नतमस्तक झाले परंतु त्यांनी कुणाला कधीच पायाला हात लावू दिला नाही.

गाडगेबाबाचं सतत सांगणं होत की
'ज्याचा अभिमान......गे ऽऽ ला;
अन् तुका म्हणे देव झाला !

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

भजन करीत ज्याला देव व्हावं असं वाटत असेल त्याने देवाचे भजन जरूर करावं परंतु सत्य आचरणाला कधी सोडू नये, आसक्तीचा धागा धरू नये अन् निष्काम सेवा केल्याशिवाय राहू नये. नाहीतर भजन करणारे हजारो गायक या जगात झाले अन् गेले. त्यांचे नावही कुणाला माहीत नाही मग देवागिव बोलायचं बाजूलाच राहीलं हे ध्यानात घ्यावं.

● ● ●

९. माणसाचं धन कीर्ती आहे

सारी माणसं धन संपत्ती कमावण्याच्या अन् जमवण्याच्या कामाला लागली आहेत. धन किती कमावू आणि किती जमवू असं ज्याला त्याला वाटते आहे. ते धन कोणत्या मार्गाने आपण कमावत आहोत याचेही भान राहात नाही. आसक्ती एवढी वाढत जाते की त्याला मर्यादाच आपण ठेवू इच्छित नाही, समाधानच वाटत नाही. गाडगेबाबानं ही माणसाची वृत्ती ओळखली होती म्हणून ते म्हणायचे ''माणसाचं धन तिजोरी नाही, सोना नाही, हिरे नाही, बंगला नाही, मोटर नाही ! माणसाचं धन कीर्ती आहे.'' उदाहरण देताना गाडगेबाबा म्हणायचे 'जबतक सूरज, चंद्र है पुर्थईपर तबतक गांधी मरते नही, गांधीजी जिंदे है. मरनेवाले, आनेवाले, जानेवाले हम है, गांधीजीकू मरणच नही.' तुकोबारायाचे वचन सांगायचे–

तुका म्हणे एक मरणचि खरे ।
उत्तमची उरे कीर्ति....मागे ।।

मरण पर्तेकाले लांबोनार, मरण काही या जगात कोणाला ठेवत नाही, ठेवणार नाही.....कचेरीतले शिपाई मरतील की राहतील ? मरतील!

अन् कोण्या रोजी त्यांचे अंमलदार अधिकारी त्याच रस्त्यानं जातील की नाही ?

हो ऽ य !

मग मरण सगळ्यांचा काटा काहाढणार पण कीर्ती मरत नाही.

या जगात हजारो वर्ष झाले तरी राम, कृष्ण, हनुमंत अमर आहेत, येशू ख्रिस्त, महंमद पैगंबर अमर आहेत, भगवान बुद्ध, महावीर अमर आहेत,

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

गुरुनानकदेव अमर आहेत. झरतुष्ट्र अमर आहे. चक्रधरस्वामी, चैतन्य महाप्रभू, स्वामी रामतीर्थ, स्वामी विवेकानंद, रमण महर्षि, योगी अरविंद, ज्ञानदेव-नामदेव अमर आहेत. किती राजे आले अन् गेले पण सत्पुरुषांचा कीर्ती सुगंध अजूनही दरवळत आहे म्हणूनच गाडगेबाबा सांगतात की या जगात आले तर कीर्ती कमावा. कीर्ती हेच खरे धन आहे.

गाडगेबाबा सत्पुरुषांची आठवण देत लोकांना सांगत असत. तुकोबाराया किती थोर पुरुष, लोक आजही त्यांच्या देहूला जातात, त्यांच्या घरापाशी जातात, तिथली माती उचलतात, आपल्या कपाळाला लावतात आणि म्हणतात तुकोबाराया, तुमी आपल्या संसाराची होळी केली अन् लोकाहीचे घर उजळले....

मग गाडगेबाबा मुंबईच्या चार गिरण्याच्या मालकाचे उदाहरण देत म्हणत 'मुंबईच्या चार गिरण्याचे मालक–त्याच्या गिरण्यात हजारो कामगार, ते शेटजी मरण पावले, कोणी त्याच्या नावानं रडते काय ? कोणी असं म्हणते 'काय की शेटजीनं पैसा कमावला, मोटारी घेतल्या, परदेशात गेले अन् गरीबासाठी घर बांधून दिली, गरीबाच्या पोराईसाठी शाळा काढली, फार चांगला होता शेटजी ? कोणीही म्हणत नाही, दोन अश्रू ढाळत नाही.'

'उलट लोक शिव्या देतात, म्हणतत की इतल्या मजुरांना छळलं, आपली तुंबडी भरली, बंगले बांधले बरं झालं लेकाचा मेला !'

'अशा शेटजीची कीर्ती कोणी गात नाही, नाव कुणी घेत नाही, गांधीबाबाचं नाव सारे घेतात, गडे हो ! कीर्ती हेच खरं धन आहे !'

• • •

१०. विद्या मोठं धन आहे

गाडगेबाबानं आणखी एक धन लोकांना दाखवलं. ते धन म्हणजे विद्या. गाडगे-बाबानी भ्रमण काळात पाहिलं की गावातल्या दोनचार माणसाशिवाय इतरांना वाचता येते नाही अन् लिहिताही येत नाही. झाडून सारे आंगठा बहाद्दर. दिवसभर राबराब काम करावं, सायंकाळी घरी येवून दोन भाकरी आमटी संग नाहीतर बेसनासोबत खावं अन् गोधडीवर झोपावं असंचं जीवन जगावं. कोणी बुवा गावात आला त्यानं कीर्तन केलं तर ते

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

शांतपणे ऐकावं त्यांन सांगितलं तेच खरं समजावं. कुणाच्या अंगात आलं त्यानं काही म्हटलं तरसंच करावं. कुणी म्हटलं दैतोबाला बकरा दिला की दैतोबा प्रसन्न होते, वावरात खूप पिक येते. तर त्याच्या म्हणण्या प्रमाणं बकरा दैतोबाला बळी द्यावा अन् मिटक्या मारीत त्याचं मटण खावं. गावात कोणी ज्योतिषी आला. त्यानं हात पाहावा अन् भविष्य सांगाव. यान मान हालवावी. गावातल्या, खेड्यापाड्यातल्या माणसानं स्वत: कधी विचार केला नाही. पिढ्यान्‌पिढ्या हेच चाललं, गरीबीत जन्म अन् गरीबीतच मरणं.

अशी लोकांची दशा गाडगेबाबा पाहात होते, दुसरीकडे त्यांना व्यापाऱ्याच्या, दुकानदाराच्या माड्या दिसत होत्या, बंगले दिसत होते. शिकलेल्या बामणाचे घरचे लोक अधिकारी–कर्मचारी दिसत होते. सुटबुट घातलेले साहेब दिसत होते. त्यांचं चालणं बोलणं खेडुतापेक्षा वेगळंच. त्यांचा गोरापान चेहरा, त्यांचे शानशौक वेगळेच.'

मग गाडगेबाबानं याच कारण शोधून काढलं अन् खेड्या– पाड्यातले, शहरातल्या झोपडपट्टीतले लोक गरीबीत राहिले याला एकच कारण ते म्हणजे याहीले नाही विद्या. बाबा कीर्तनात सांगू लागले की ज्याले विद्या नसेल त्याले खटाऱ्याचा बैल म्हटलं तरी चाले ऽऽ ल ! आता तरी सुधरा, आता तरी मुलाले शिक्षण द्या. पैसे नाही म्हणाल; तर जेवणाचं ताट मोडा, हातावर भाकरी खा, बायकोले लुगडं कमी भावाचं घ्या, इव्हायाला पाहुणचार करू नका. धकू द्या पण मुलाले शाळेत घातल्याविण सोडू नका ऽऽऽ ! विद्या मोठं धन आहे.

गाडगेबाबा गावोगावी हिंडत होते. त्याकाळात आपल्या देशात फक्त पाच टक्के लोकांनाच लिहिता वाचता येत होत. ब्रिटीशांचं राज्य होतं. त्यांना इथल्या माणसाची फिकीर नव्हती. ते खरे व्यापारी होते. कच्चा माल हिंदुस्थानाकडून विलायतला न्यायचे, तिथं त्याचाच पक्का माल करायचे अन् परत तोच माल इथं आणून विकायचे. मिळालेला नफा आपल्या देशात घेवून जायचे हीच त्यांची नीती होती. इथल्या माणसांना राबराब राबून घ्यायचे. चार–दोन लोकांना नोकऱ्या द्यायचे त्यांना खुश ठेवायचे, बाकी सारे मेले तरी त्यांना पर्वा नव्हती. इथल्या धर्मकारणात आणि समाजकारणात त्यांनी लक्ष दिलं नाही. तुमचंच बरोबर आहे असे सांगत राहायचे. धर्माधर्मात अन् जातीजातीत फूट कशी राहिलं हेच ब्रिटीशानं पाहिलं अन् आपली पोळी शेकून घेतली.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

गाडगेबाबा हे सारं उघड्या डोळ्यानं पाहात होते. ते अशिक्षित असले तरी त्यांना ते सारं कळत होतं. पण ते ब्रिटीशांना दोष देत नव्हते ते इथल्याच शिकल्या सवरल्या माणसाला म्हणायचे जरा इकडे लक्ष द्या गोरगरीबाकडे. अन् गोरगरीबाला म्हणायचे अरे भाऊ तू नाही शिकला पण पोराले तरी शिकवं, पोरीले तर शिकवं चार वर्ग शिक्षण.

गाडगेबाबा म्हणत होते 'यातलेच माणसं दिल्लीच्या तक्तावर भाषण करतात आणि यातलेचं माणसं बोरीबंदरच्या टेसनावर पोते उचलतात. ते माणसं अन् हे कोण ? हे काइ बैल नाही ना ? कोण आहेत ? माणसं ऽऽऽ ! मोठी गोष्ट आहे विद्या. मोठी गोष्ट आहे या टायमाले विद्या, मुलाले न शिकवाल तर तुम्हाले आम्हाले विद्या नाही तर मजुरी तरी लागली. पण पुढं तुमच्या मुलाले मजुरी लागणार नाही तर बुटपॉलीश करावं लागले.' असे परोपरीने गाडगेबाबा विद्येचं महत्व बहुजन समाजाला, दीन–दलितांना मोठ्या पोटतिडकीनं सांगत होते. कधी कर्मवीर भाऊराव पाटलाच्या सातान्याच्या धनिनीच्या बागेत जायचे, तेथील विद्यार्थ्यांच्या वसतिगृहात जावून मुलांना भेटायचे, त्यांना मदत मिळवून द्यायचे. त्यावेळच्या सरकारलाही गाडगेबाबा भाऊरावं पाटलाच्या रयत शिक्षण संस्थेला मदतीचा हात देण्यास सांगत, अमरावतीला आले तर डॉ. पंजाबराव देशमुखांनी सुरु केलेल्या श्रद्धानंद वसतिगृहात अवश्य जात. तिथल्या विद्यार्थ्यांसाठी ताट वाट्या पोहचत्या करीत.

गाडगेबाबांना डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचा भारी अभिमान. ते कीर्तनात डॉ. बाबासाहेबांच्या कार्याचा अवश्य गौरव करीत. 'डॉक्टर आंबेडकरसाहेब यांच्या पिढ्यान् पिढ्या झाडू मारायचं कामं केलं. यांच्या वडिलाले सुबुद्धी सुचली आणि आंबेडकरसाहेबाले शाळेत घातलं. आंबेडकर साहेबानं काही लहानसहान कमाई केली नाही. हिंदुस्थानची घटना लिहिली. अन् तेच शाळेत जाते ना, अन् शिकतेना, तर झाडू मारणंच कर्मात होतं. बाप हो ! विद्या मोठं धन आहे.'

गाडगेबाबा केवळ बोलके नव्हते ते स्वतः कर्ते सत्पुरुष होते त्यांनी गोरगरिबांच्या मुलांसाठी मूर्तिजापूरला शाळा उघडली, अनेक ठिकाणच्या शाळेला हस्ते परहस्ते मदत केली. ते सतत लोकांना सांगत राहिले, विद्या मोठं धन आहे, विद्या मोठं धन आहे. आज बहुजनातील व दलित समाजातील काही

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

लोक शिकलेले दिसतात तो गाडगे- बाबासारख्या महापुरुषांच्या तळमळीचाच परिणाम आहे हे विसरता कामा नये. गाडगेबाबांच्या तत्वज्ञानात विद्येला निश्चितच विशिष्ट स्थान हे जाणकारांनी वेळीच ओळखून इतिहासात त्याची नोंद केली पाहिजे.

● ● ●

११. देव धन देत नाही

अनेक लोकांचा असा समज झालेला आहे की देवच सर्वांना पाहिजे ते देतो. तोच बुद्धी देतो, तोच धन देतो. त्याच्याकडून सारं आम्हाला मिळते. त्यांच नाव घेत राहिलं, त्याचं भजन केलं, त्याची भक्ती केली, पूजाअर्चा केली की तो प्रसन्न होतो आणि त्यास जे मागीतलं ते देत असतो. गाडगेबाबा अशा विचाराचे नव्हते. त्यांच्या मते देव धन देतच नाही. माणसालाच ते कमवावं लागते. गाडगेबाबा कीर्तनातूनही सांगत 'आमचे भोळवट लोक, अरे नारायणानं घर बांधलं गावाला. पाच्र हजार रुपयाचं, दोघं तिथं म्हणतात- लेका त्याले देवानं दिलं. कुणी दिलं ? देवा ऽऽऽ नं ! मरा पावसा-उन्हाळ्यात, देव घर नाही देत मरा खुशाल. घर बांधील माणूस. अन् घर गमाइल माणू ऽऽ स ! हे भोळवट, देवानं दिलं.'

गाडगेबाबानं मारवाडी, गुजराथी, भाटे, ब्राह्मण अशा लोकांचं मुंबईतलं, नागपूरातलं, अमरावतीतलं जीवन पाहिले होतं. त्यांच्या गिरण्या, त्यांची महाल, त्यांचे नोकर चाकर अन् त्यांच्या कारभाराचा व्याप, लक्ष्मीची देवाण-घेवाण आणि त्यांचे जेवण-खावणं, पाहिलं होतं म्हणून ते कीर्तनात त्यांचीच उदाहरणं बहुजनासमोर ठेवित असत.

''बंबईमध्ये जास्त लक्ष्मी कोणाजवळ आहे ? मारवाडी, गुजराथी, भाटे आणि ब्राह्मणांजवळ ! खाना खराब कोणाचा झाला मुंबईत ? मराठे, माळी, तेली, न्हावी, धोबी, चांभार, कोळी, कुंभार, लोहार, वडारी, बेलदार, कैकाडी, गोंड, गवारी, मांग आणि महार- जनावरासारखं. तीनच माणसं मजेशीर आहेत, गुजराती, मारवाडी, ब्राह्मण. दररोज तुपाचा शिरा खातात. आज कोणाही मराठ्याले पुसा जेवला कां ? होय कालवण, आमटी. आजापंजापासून आमटी याच्या घरात घुसली बाहेर निघतच नाही'' असे गाडगेबाबा आपल्या पद्धतीनं

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

हावभाव करून कीर्तनात बोलत. या विधानात फार मोठं सत्य आहे. येथे जातीद्वेष नाही, येथे दुसऱ्याचे वैभव, जेवणखावण पाहून झुरणं नाही, त्याचा मुळीच लेश नाही. येथे वस्तुस्थितीचे प्रत्यक्ष दर्शन आहे. गुजराती, मारवाडी, ब्राह्मण मंडळी कला कुशलतेने, आपल्या व्यवहारानं, चतुरतेने आणि उद्योगानं धन कमवतात, पैसा शिल्लक टाकतात. रात्रंदिवस व्यवहारात अन् स्वकामात मग्न राहतात. तेव्हा कुठे लक्ष्मी त्यांच्या घरी नांदते. कोणताही देव काही त्यांच्या घरी आपोआप धन पाठवित नाही. हे सर्वांनी ध्यानात ठेवावं. यासाठीच गाडगेबाबा हे सांगतात. खरेच ईश्वरानं आपली ही सृष्टी निर्माण केली. काही नियम तयार केले. त्या नियमातला एक महत्वाचा नियम आहे 'जसे कर्म तसे फळ' जसे कर्म कराल तसेच फळ मिळेल. देव आपल्या हातचे काही देत नाही आणि आपल्या हातात दुसऱ्याचं काही राखून ठेवीत नाही. ज्याचे त्याला देतोच. त्याचेजवळ दुजाभाव नाही. अमुक माझी मोठी पूजा करतो म्हणून त्यांला मोठं धन देतो, मोठा पगार देतो असे कधी होत नाही आणि तमुक माझी पूजाच करीत नाही म्हणून त्याला काही देत नाही असे घडत नाही. देव ज्याचे त्याच्याच पदरात टाकतो. गाडगेबाबांना हे चांगलं माहीत होतं. त्यांनी गीता वाचली नसेल, बायबल पाहिलं नसेल, कुराण ऐकलं नसेल परंतु त्यांनी कर्म सिद्धान्त निसर्गात पाहिला, पशुपक्ष्यात पाहिला, वनस्पती-पिकातही पाहिला. जे पेरलं तेच उगवते. याचा अनुभव घेतला. हा कर्मसिद्धांत अनुभवातून गाडगेबाबानं सांगितला आहे. त्यांच्या तत्वज्ञानाचं हे महत्वाचं सूत्र आहे.

• • •

१२. जमाखर्च ठेवलाच पाहिजे

आपल्या घरी लक्ष्मी यावी, धन यावं यासाठी कष्ट करावे लागतात हे खरं आहे पण त्या धनाचा विनिमय कसा करावा याची दृष्टी सुद्धा माणसाला पाहिजे याची आठवण गाडगेबाबा बहुजनांना करून देत होते. त्याचं स्पष्ट मत होतं की मारवाडी, गुजराथी, ब्राह्मण, भाटे जसी काटकसर संसारात करतात, जसा जमाखर्च करतात तसा जमाखर्च बहुजन लोक करीतच नाही. ''या लोकांना जमाऽऽऽ खर्च ! उत्पन्न किती अन् खर्च किती याची लैन मालूम आहे अन् आमच्या मराठ्याले, तेल्या, माळ्या,

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

न्हाव्या, धोब्याले जमाखर्च समजतच नाही. याचं कसं आहे ? पौणशे रुपये उत्पन्न आणि ऐशी रुपये, नव्वद रुपये खर्च. जानेवारीत मजा करा आणि फेपरवारीत बोंबलत बसा. बों ऽऽ बों ऽऽ.'' गाडगेबाबानं वास्तविकताच येथे दर्शविली आहे. बहुजनाला जमाखर्चच माहीत नाही. हिशोब ठेवण्याच्या भानगडीतच पडत नाही. आमच्या शेतकऱ्यांचे तसेच आहे. लाखातून एखादाही शेतकरी आपला जमाखर्च ठेवीत नाही. आला पैसा खर्च केला, पैसा संपला की कर्ज काढण्यासाठी सावकाराच्या दारात नाही तर बँकेच्या कार्यालयात येरझारा सुरू.

पगारदार लोकांबाबत गाडगेबाबा हितोपदेश करीत– 'लई जनम्हमतात पगार पुरत नाही ऽऽऽ ! पगार सरतच नाही असं म्हटलं पाहिजे. ज्या घरात नवरा–बायको बुद्धिमान, अक्कलवान असतील तीथं पगार सरत नाही. शिल्लक पेटीत टाकली पाहिजे.''

गाडगेबाबांचा काटकसरीचा अन् बचतीचा विचार आजच्या काळात अधिकच महत्वाचा आहे. दिवसेंदिवस खर्च वाढत आहे. उत्पादनापेक्षा उपभोगवृत्ती वाढीस लागलेली आहे. दैनंदिन जीवनातच नव्हे तर सार्वजनिक जीवनात हे बचतीचे तत्वज्ञान अमलात आणले गेले पाहिजे तरच उन्नतीची दारं उघडतील, देशात विकासाची पावलं पडतील अन्यथा घाट्याच्या बजेटने आर्थिक गुलामगिरी आपल्या देशावर थोपवली जाईल. गाडगेबाबांच्या या बचत सिद्धान्तावर आपण अवश्य विचार करु या.

● ● ●

१३. देवाचेच देवाला देतो

ईश्वराने ही सृष्टी निर्माण केली असे आपण सामान्य माणसं म्हणतो. शास्त्रज्ञांच्या मते ही सृष्टी उत्क्रांती –वादाप्रमाणे विकसित होत गेलेली आहे आणि पुढेही उत्क्रांतीवादा– प्रमाणे तिचा विकास होतच राहील. निसर्गातील घडामोडी निसर्गातील शक्तीमुळेच घडत असतात. निसर्गच निसर्गाला देत असतो, निसर्गच निसर्गाकडून घेत असतो. निसर्गात प्रत्येक गोष्टीच एक चक्र असते. गाडगेबाबांना शास्त्रज्ञांचा उत्क्रांतीवाद कदाचित माहीत नसेल परंतु त्यांच्या सूक्ष्म दृष्टीतून त्यांना स्पष्ट दिसत होते की

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

:वाचेच देवाला दिले जाते. माणूस स्वतः जवळच काही देत नाही. स्वतःचं याचं काही आहे असा भावच माणसानं आपल्या मनात ठेवू नये असे गाडगेबाबांना वाटत होते. अशी वृत्ती ज्याची असते त्याच माणसाचा उद्धार होत असतो. त्यालाच आसक्ती नसते. दान देताना माणसानं नेहमी समजलं पाहिजे की हे माझे नव्हेच, मी याचा कर्ता नाहीच, मला देवानं दिलं तेच मी गरजूला, रंजल्या गांजल्याला देत आहे, हेच माझे देव आहेत. देवाचचं देवाला देतो आहे.

● ● ●

१४. देव-देवता स्वप्नात दिसत नाही

काही लोकांचं असं म्हणणं असते की काल रात्री भगवान विष्णू माझ्या स्वप्नात आले. त्यांना चार हात होते, शंख चक्र गदा त्यांच्या हातात होती. ते सागरात आनंदानं पहुडले होते. त्यांची पत्नी लक्ष्मी पाय चुरत होती अन् नारदमुनी तिथं आले होते. विष्णूचे ते रूप पाहून मला खूप आनंद झाला, मला देव प्रसन्न झाले असे सांगून भोळ्याभाळ्या जनांवर छाप पाडतात, कोणी म्हणतात– भोळा शंकर दिसला होता. तो म्हणे 'तू शिवरात्रीला महादेवाला ये', कोणी म्हणतात 'रात्री माझ्या स्वप्नात माझी कुलदेवता तुळजापूरची भवानी आली होती,' कोणी म्हणतात 'माझे गुरु रात्री माझ्या स्वप्नात दिसले' असे सांगणाऱ्या आणि ऐकणाऱ्यांना गाडगेबाबा साध्या शब्दात सांगतात 'अरे भोळसट लोकांनो ! जे जे मनी वसे ते ते ?.. स्वप्नी दिसे ।। हे साधंही तुम्हाला समजत नाही. ज्या देव वा देवीचा पाहणाऱ्यांनी फोटो पाहिला असेल त्या फोटोतलाच देव त्यांना दिसला. त्यांच्या मनात होता तो त्याला स्वप्नात दिसला. तो फोटो होता. देव नव्हता, ती देवी नव्हतीच. गाडगेबाबा लोकांना विचारता 'माहा बाप स्वप्नात तुम्ही पाहिला होता का कधी ?'

लोक म्हणत– 'ना ऽऽ ही'

मग जे पाहिलं नाही ते दिसतच नाही. देव नाही दिसत, देव दिसायची वस्तूच नाही.

गाडगेबाबांचे हे प्रत्यक्ष जीवन तत्वज्ञानाचे सूत्र आहे. जे पाहिलं नाही ते कुणाला कधीच दिसत नाही. आपला मेंदु हा एक काम्पुटरच आहे. या काम्पुटरमध्ये जे टाकले असेल, जे भरले असेल तेच बटन दाबल्यावर दिसायला लागते. हाच

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

सर्वत्र अनुभव आहे. म्हणून सर्वांनी लक्षात ठेवणे अत्यावश्यक आहे की कोणताही देव वा परमात्मा स्वप्नात येत नाही. जे पाहिलं असेल, जे मनात रुजलं असेल, त्याचाच आविष्कार, त्याचीच स्मृती आपल्याला होते आणि ती भावनाच स्वप्नसृष्टीत प्रकट होत असते, आणि तो सारा भासच असतो.

असे स्वप्नात पाहणारे अन् तसे सांगणारे बुवा असतात त्यांच्यापासून जनतेने दूर राहावे. त्यांच्याकडे लक्ष देवू नये. त्यांच्या भोंदूगिरीपासून सावध राहावे.

● ● ●

१५. या विश्वात फक्त दोनच जाती आहेत

समाजात राहात असताना एक-मेकाचा परिचय करून देत असतात. एक माणूस म्हणतो हा ब्राह्मण आहे, दुसरा म्हणतो हा कुणबी आहे, तिसरा म्हणतो हा महार आहे, चौथा म्हणतो हा मांग आहे, तो वडर आहे, तो ढोर आहे, तो गोंड आहे, तो गोवारी आहे. गाडगेबाबा जेव्हा हे पाहात आणि ऐकत तेव्हा त्यांना आश्चर्यच वाटे. गाडगेबाबा जात पुसणाऱ्या माणसाला म्हणत- ''जो जात पुसते त्याच्यासारखाच तो आहे की नाही ? हो ऽऽ य ! याले चार हात अन् त्याले दीड हात आहे काय ? बोला ना ऽऽ ही ! यानले चार पाय आहेत अन् त्याले एकच तंगड आहे असं आहे काय ? ना ऽऽ ही ! मग तू कोण का पुसतो ? कोणी तुम्हाले जात विचारलं तू कोण तर म्हणावं, मी माणूस. कोण आहात तुम्ही ? माणूस.''

गाडगेबाबा म्हणत- ''जाती ह्या मनुष्यनिर्मित आहेत, ह्या परमे-श्वरनिर्मित नाही. एका गृहस्थास उत्तम कपडे घातले व त्याच्या हातात पंचांग दिले तर त्या इसमास लोक ब्राह्मण म्हणतील, त्याच इसमास साधारण कपडे व हजामतीचे सामान दिले तर न्हावी समजतील, त्यालाच कपडे शिवण्यास बसविले तर शिंपी म्हणून ओळखतील; तोच मनुष्य रस्त्यात बसून फाटके-तुटके जोडे शिवू लागला तर तो चांभार ठरेल. ह्यावरुन जाती कशा निर्माण झाल्या हे सिद्ध होत आहे. ब्राह्मण, मराठा, मुसलमान व महार अशा चार बाया एका घरात एकाच दिवशी बाळंत झाल्या. दोनचार दिवसानंतर त्या बायांना बाहेर नेले आणि त्या मुलांच्या बापांना आपली मुले ओळ- खण्यास सांगितले तर त्यातील कोणीही

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

आपले मूल ओळखू शकणार नाही, यावरुन जाती ह्या परमेश्वरनिर्मित नाहीत, मनुष्य निर्मित आहेत.''

जाती माणसानं पाडलेल्या आहेत आपल्या सोयीसाठी, समाजधारणेसाठी. गुणकर्मानुसार जाती तयार झाल्या पण गुणकर्म बाजूलाच राहिले, काम बाजूलाच राहिले अन् त्याची जातच पुढे आली. मडके घडवतो तो कुंभार, लाकूड तासतो तो सुतार, बँड वाजवतो तो मांग, जोडे शिवतो तो चांभार, लढाईवर जातो तो क्षत्रिय अन् पुजापाती सांगतो, ग्रंथ वाचतो तो ब्राह्मण, धंद्याप्रमाणेच जाती तयार झाल्या मग उंच नीचपणा आला. एक म्हणे आमची जात उच्च, तुमची जात नीच. आम्ही तुमचे हातचे खाणार नाही, खाल्ले तर आम्हास विटाळ होतो, तुमच्या हातचे पाणी पिणार नाही, आमची विहीर अलग अन् तुमची विहीर अलग, विहीर नसेल तर नदीत विहीरा खोदा अन् पाणी घ्या, अळवणीचं पाणी गड्व्या गडव्यानं घ्या पण आमच्या विहीरीच पाणी काढता येणार नाही. विहीरीचं पाणी काढाल तर मार बसेल लक्षात ठेवा. गाडगेबाबानं अस्पृश्यांचे काय हाल आहेत हे डोळ्यानी पाहिलं. त्यांची घरे पाहिली, त्यांच्या झोपड्या पाहिल्या. ते पित असलेलं पाणी त्यानी पिऊन पाहिलं आणि चुकून एखादेवेळी सवर्णाच्या विहीरीचे पाणी प्यायले तर चाबकाचा चोप कसा बसतो हे अनुभवले होते. ते स्वतः एखाद्या विहीरीवर जायचे तेथली दोर बादली घेऊन भरभर पाणी काढायचे आणि पाणी पिऊ लागायचे आणि मग आमची महाराची विहीर हीच काय ? असे विचारायचे. महारड्याने आपली विहीर बाटवली म्हणून तो गृहस्थ काठीने बाबाला झोडपायचा, अंगाची सालपट काढायचा आणि खबरदार पुन्हा इकडे फिरकला तर...नाही तर जीवच घेईन अशी धमकी द्यायचा. हे सारे गाडगेबाबांने अनुभवले होते.

गाडगेबाबाना सारी माणसं सारखीच दिसत होती. भेदाभेद अमंगळ हे त्यांच्या रोमारोमात लहानपणापासून भरलं होतं. लोक भेदाभेद कां करतात हेच त्यांना कळेना, सारे एकाच मार्गानं या जगात आलेले आहेत मग हा विटाळ अन् शिवाशिव करण्याचे काही कारणच त्यांना दिसत नव्हते, ते सर्वांत मिसळले, सर्वांबरोबरच जेवले, सर्वांबरोबरच राहिले. त्यांना हा माझा अन् हा तुझा हा विचारच सुचला नाही. उच्च-नीच हा भावच त्यांच्यापाशी नव्हता ते अव्दैत तत्वाचे होते. त्यांना फक्त दोनच जाती दिसत होत्या. एक पुरुषाची अन् दुसरी स्त्रीयांची. या विश्वात ह्याच फक्त दोन जाती आहेत. तिसरी जातच नाही.

● ● ●

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

१६. स्वच्छता आहे तिथंच देवाचं राज्य आहे

गाडगेबाबांना माणसं प्रिय होती तसंच भजन प्रिय होत. गाडगेबाबा स्वच्छतेचा पाठ शिकविताना विज्ञान शिकवित होते आणि भजनाचा पाठ शिकविताना अध्यात्म शिकवित होते. अस्वच्छता हे सर्व रोगाचे मूळ आहे. जिथे अस्वच्छता आहे तिथे रोगराई आहेच. अस्वच्छता तिथं प्रदुषण आहे. अस्वच्छता आहे तिथं सडणं-कुजणं आहे. कर्बाम्ल वायुचे प्रमाण अधिक आणि प्राणवायुचे प्रमाण कमी आहे. विज्ञानाची मूलतत्वे गाडगेबाबानं शाळा-कॉलेजातल्या विद्यार्थी-प्राध्यापकाप्रमाणे अभ्यासली नाहीत पण त्यांना एवढं माहीत होत जिथं घाण आहे तिथं रोगांचे वास्तव्य असते. त्यांना हे कोणी शिकवलं नाही, त्यांनी डोळ्यांनी पाहिलं, तेच जगाला सांगितलं.

गाडगेबाबा लहानपणी दापुऱ्याला मामाचे घरी होते तेव्हाच त्यांनी स्वच्छतेचा पाठ शिकून घेतला. गाईबैलाच्या गोठ्याला दररोज खराट्याने स्वच्छ करणं, शेणपुंजा करून टोपलं भरुन उकंड्यावर रोज निवून टाकणं. घराचा परिसर झाडून काढणं हे त्यांचे नित्याचेच काम होते. पुढे गृहत्याग केल्यावरही त्यांच्या हातात झाडूच होता. गावची गल्लीबोळ झाडायचं कामं गाडगेबाबा करीत राहिले आणि स्वच्छतेचा पाठ गावकऱ्यांना शिकवू लागले. त्यांच्यासोबत काही मंडळी राहात होती तेव्हाही गावात प्रवेश करताचं पाहिलं काम म्हणजे गावाची स्वच्छता. नाल्या मोऱ्या साफ करून सारं गाव कसं आरशासारखं करायचे. गाडगेबाबा आणि त्यांचे सोबतचे गडी, कैकाडी बाबा, शिंदे महाराज, शेलारमामा, जोशीबुवा असे त्यांचे सोबतचे अनेक गडी स्वच्छतेचेच पाठ देत राहिले जीवनभर. स्वच्छता असते तिथचं देवाच राज्य असते. हात फिरे तिथं लक्ष्मी ठरे हे याचीच पुनरावृत्ती करून दाखविली गाडगेबाबानं. स्वच्छता आणि आरोग्य, स्वच्छता आणि प्रसन्नता, स्वच्छता आणि आनंद, स्वच्छता आणि धन-दौलत याचं समीकरण गाडगेबाबानं जगासमोर मांडलं आणि प्रत्यक्ष कृतीतून ते करून दाखवलं. गाडगेबाबांच्या जीवन तत्वज्ञानात स्वच्छतेला अग्रक्रम होता. ते गेल्यावर पन्नास वर्षानंतर आम्हाला ते कळायला लागलं आहे म्हणूनच गाडगेबाबा स्वच्छता अभियान सुरु केलं आहे.

● ● ●

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

१७. भजन आहे त्या घरात देवाची राखण आहे

स्वच्छता आहे तिथं देवाचं राज्य आहे पण ज्या घरात भजन आहे. त्या घरात देवाची राखण आहे हे सुद्धा गाडगेबाबानं आम्हाला सांगितलं. हे विसरता येणार नाही. गाडगे- बाबा दररोज कुठं ना कुठं भजन-कीर्तन करीत होते. परिभ्रमण काळात सामुहिक भजन म्हणायला लाविल-राधा ऽ राधा कृष्ण राधा कधी कधी बाबा भजन गात- 'राम राम राम सिता ऽ राम.' देवाचं नाव घेण्याची परंपराच या देशात आहे. ही परंपरा अतिशय चांगली आहे. घराला ही परंपरा वळण देत असते हे गाडगेबाबानं बालपणीच ओळखलं होतं, भजनाशिवाय एक दिवस ही त्यांचा जात नव्हता. कीर्तनात पुढे 'गोपाला गोपाला देवकीनंदन गोपाला' ही धून सारखी वाजत राहिली. असे भजन घराघरात व्हावं असं त्यांना वाटायचं. देवाचं नाव घेतलं की माणसाला वाटते आपल्या भोवताल देव आहे. आपण जे बोलतो ते तो ऐकत असतो, आपण जे जे काही करतो तो ते पाहात असतो. त्याचं लक्ष आपल्याकडं आहे. कठीण प्रसंगी देव मदतीला धावून येत असतो असा विश्वास वाढत जातो म्हणूनच गाडगेबाबानं देवाचं भजन करायला सांगितलं. देवाचं स्मरण घरात सकाळी-सायंकाळी केलचं पाहिजे असं ते गावकऱ्यांना सांगायचे कारण याचे परिणाम आपल्या मुलाबाळांवर होतात आणि ते चांगल्या मार्गानं चालायला लागतात. नीतिचे पाठ घरातूनच प्रथम दिले पाहिजेत. त्यासाठी भजन करा, देवाचं नाव घ्या अस्सं गाडगेबाबा सांगत असत. आपल्या घराची राखण करण्यासाठी भजन करण्याची गरज प्रतिपादन करीत. गाडगेबाबा संत तुकारामाच्या शब्दात सांगत-

लागोनिया पाया विनवितो तुम्हांला ।
कर टाळी बोला मुखी नाम ॥

● ● ●

१८. सर्व मुलं सारखीच असतात

अध्यात्मशास्त्रानुसार माणूस जन्माला येतो तेव्हा तो आपले पूर्वजन्मीचे संस्कार घेवून येतो, आपले भाग्य आपल्यासोबत आणत असतो, प्रारब्धानुसारच माण-

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

साचं जीवन घडत असते, दैवात असेल ते कधीच चुकत नाही. दैवाप्रमाणेच आपल्याला जात मिळते. कोणत्या जातीत जन्माला देणं हे देवाच्या हाती आहे असा आमचा समज आहे पण गाडगेबाबांना हा समज मान्य नाही, हा विचार तुमच्या जवळच राहू द्या आणि काळाची पावलं ओळखा असे सांगत असताना गाडगेबाबा म्हणत 'कोण्याही जातीचे पन्नास पोरं जमवा शिकवा त्याले, वेद बोलून घ्या. भागवत ऐकून घ्या जे सांगेल तेच ही मुलंही सांगतील' गाडगेबाबानं यातून ध्वनीत केलं की ब्राह्मणाच्याच पोरानं वेद वाचावेत अन् भागवत सांगावं हा विचारचं चुकीचा आहे. धर्मस्थळी काही निवडक जातीचे मुलांना वेद शिकवतात, भागवत शिकवतात. तिथं महार–मांगाच्या पोरांना, पारधी–गोंडाच्या लेकरांना स्थान नसते. लभानाच्या अन् परीटाच्या मुलांना कोणी घेतच नाही. त्यांना कोणी रामायण–महाभारत–गीता शिकवितच नाही. त्याच्या बापानं अन् आजोबानं तो परिपाठ केलाच नाही तर त्याच्या लेकरांना नातवांना कसं येईल त्याचं ज्ञान. हे तुमचं काम नव्हे, तुम्हाला ते नाही जमायचं असं म्हणून त्यांना बाजूला ठेवतात आणि आपलीच मुलं शिकवतात, आपल्याच मुलांवर तसे संस्कार करतात ही वस्तुस्थिती गाडगेबाबा बहुजनांना, दीनदलितांना, रानावनात राहणाऱ्या आदिवासी लोकांना सांगत होते आणि जातीजातीचा भेद न करता सर्व जातींच्या मुलांसाठी हे वेद उपनिषदाचे, गीता–भागवताचे दरवाजे उघडे करा असेच गाडगेबाबांना उच्च समजणाऱ्या जातींच्या लोकांना सांगायचे होते आणि कीर्तनातून जागोजागी जीवनभर ते सांगत राहिले. ज्ञानाची दारे सर्वांसाठी खुली करा असाच गाडगेबाबानं अन् त्यांच्यासारख्या महापुरुषानं विसाव्या शतकात जीवनभर टाहो फोडला. म्हणूनच आजच्या पिढीत काही मागस जातीत जन्मलेले कीर्तनकार–प्रवचनकार दिसतात, काही शास्त्रज्ञ दिसतात, काही संगीतकार दिसतात, काही साहित्यकार, काही विचारवंत दिसतात. काही प्रशासक दिसतात.

मुलांवर जसे संस्कार कराल तशीच मुलं घडतात हा सिद्धांतच गाडगेबाबा सांगून गेले. त्याच्या जातीवर काही अवलंबून नाही, जसे घडवाल तसेच घडेल. सर्व जातातील मुलं ही जन्मतांना सारखीच असतात हे ध्यानात घेण्याचा गाडगेबाबाचा आग्रह होता.

• • •

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

१९.माझा कुणी शिष्य नाही

आपल्या देशात गुरुपरंपरेला मोठे स्थान आहे. दत्तात्रयाने चोवीस गुरु केले होते. गुरुनानकानंतर गुरुपरंपरा गुरुगोविंदसिंहापर्यंत आली. ज्ञानेश्वरानं आपले वडील बंधु निवृत्तीनाथास गुरु केले होते. नामदेवानं विसोबा खेचरास गुरु केले होते, तुकारामान स्वप्नातच गुरु केला होता. तुकडोजी महाराजानं वरखेड क्षेत्रीचे सद्‌गुरु आडकोजी बाबांना गुरु मानले होते परंतु गाडगेबाबानं कुणालाच गुरु केले नाही अन् कुणालाच गुरु मानले नाही. गाडगेबाबा स्वयं तत्वावरच उभे झाले. विश्वात जे पाहिलं तेच त्यांनी लोकांना सांगितलं, कित्येक संत-महात्म्यानं एखाद्या ग्रंथालाच गुरु मानलं. गीतेत सांगितलं तेच सांगितलं. भगवद्‌गीतेलाच गुरुस्थानी मानलं. गाडगेबाबानं कोणतचं पुस्तक वाचलं नाही अन् पुस्तकास गुरु मानलं नाही. विश्व हेच त्यांच पुस्तक होतं ते पुस्तक मात्र त्यांनी अतिशय बारकाईनं अन् सूक्ष्मदृष्टीन वाचलं होत यात काही शंका नाही.

गाडगेबाबांना गुरु-शिष्य तत्वज्ञान मान्यच नव्हतं, गाडगेबाबाचं नाव सर्वत्र व्हायला लागलं. त्यांची कीर्तन गावोगावी व्हायला लागली. कीर्तन आटोपल्यावर गाडगेबाबाना शेकडो स्त्री-पुरुष आग्रह करीत की बाबा, आम्हास माळ घालून द्या, आम्हाला शिष्य करून घ्या पण गाडगेबाबानं कोणालाही माळ घातली नाही, शिष्य केलं नाही.

कीर्तनात गाडगेबाबा जाहीरपणे सांगत की ''माझा कोणीच शिष्य नाही, कारण मी कोणासच शिष्य केले नाही.'' वारस सांगितलाच नाही. आपल्या नातेवाईकांचा कुठचं हक्क ठेवला नाही. त्यांना धर्मशाळेत हक्कानं राहण्याची परवानगी सुद्धा नव्हती. त्यांनी आपली सोय करावी असे त्यांचे सांगणे होते. कोणत्याही संस्थेचे सभासद व पदाधिकारी आपल्या मुलीला व नातवांना गाडगेबाबानं केलं नाही. त्यांनी आपला वारस ठरवलाच नाही. जो सेवा करीत असे निष्काम भावनेन, त्याच्याचकडे धर्मशाळेचं काम बाबा देत गेले. त्यांनी प्रत्येक धर्मशाळेचें विश्वस्त नेमून दिले.

गाडगेबाबा नेहमी म्हणत 'माझा कुणी गुरु नाही अन् माझा कुणी शिष्य

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

नाही.' गुरुपरंपरेला गाडगेबाबानं फाटा दिला. परंपरा- वादाकडून परिवर्तनवादाकडे लोकांनी चालत राहावे यासाठी त्यांनी जुन्या जीर्ण रूढ्यांना मुठमाती दिली. गुरुचे स्तोम नसावे आणि गुरुच्या नावावर शिष्यांचे ऊतमात नसावे. प्रत्येकाने आपल्या बळावर आपले जीवन उभारावे. आपलं स्वतःच सामर्थ्य स्वकर्तृत्वानं वाढवावं आणि त्या सामर्थ्याचा उपयोग सेवाकार्यासाठी करावा हेच गाडगेबाबानं सांगितलं आहे. एक नवा मार्ग दाखविलेला आहे.

● ● ●

२०. धनगरांची मेंढरं बनू नका

गाडगेबाबा हे जगातील व्यवहारांचे विश्लेषण आपल्या पद्धतीने करीत होते. ते म्हणायचे 'बंबईमधे एका एका धन्यानं दहा दहा बिल्डिंगा बांधल्या. एका माणसानं-अन्‌एका माणसाले नवरा बायकोच्या पुरती साली झोपडी बांधायची अक्कल नाही. हा माणूस नाही याले धनगराचं मेंढरु म्हटलं तरी चालेऽलं ! पाच पाचशे रुमा आहेत. पाचशे रुपये भाड्याच्या रुमा-चौपाटी-अन् सालं पाच रुपये महिन्याचं ज्याला भाडे द्यायला सापडत नाही. हा माणूस नाही. त्याले धनगराचं मेंढरु म्हटलं तरी चालेऽलं !''
गाडगेबाबांच्या या विधानात फार मोठं मर्म आहे. दोन्ही माणसं आपल्या आईबापानं तयार केली आणि या जगात आणली पण केवढा फरक आहे या दोघात. एकाच्या दहा-दहा बिल्डिंगा अन् एकाला साधं झोपडंही नाही याची कारणं शोधायला गाडगेबाबा सर्व ज्ञानी-अज्ञानी लोकांना सांगत आहेत. कारण शोधली तर निश्चितच त्यांचा वेध घेता येतो. हा फरक समाज रचनेतील उणीकमुळे आहे की माणसाच्या कर्तृत्वामुळे आहे यांचा शोध लावता येतो. गाडगेबाबा माणसाच्या कर्तृत्वाकडे बोट दाखवित त्याला चेतवतात की तूही माणूस आहे. तूही मोठा होवू शकतो पण धनगराच्या मेंढरासारखा खाली मान टाकून रानोरान हिंडू नकोस. तुझ्यासमोर ध्येय ठेव, त्या ध्येयाच्या दिशेनं वाटचाल कर, कष्ट कर, विचार कर, तुझा विवेक जागृत कर. मेंढरासारखं राहू नको. स्वतःच्या बळावर तुझं विश्व निर्माण कर. गाडगेबाबांच्या विधानातलं मर्म ज्यांना समजलं त्यांनी आपली वाट धरली आणि मेंढरं न राहता वाघासारखे गर्जना करते झाले, स्वतःच्या बळावर ज्यांनी वाट धरली नाही ते आजही तसेच आहेत.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

गाडगेबाबांना लोकजागरण करावयाचे होते म्हणून अज्ञानी लोकांना धनगराची मेंढरं म्हटलं आहे. लोक रामायण-महाभारत ऐकतात अन् माना डोलवतात. त्यातील प्रसंग जसेच्या तसे घडले आहेत असे समजतात. हनुमंतानं उड्डाण केलं अन् लंकेत जावून पोहचला. रामाचा पाय लागला आणि पाषाणाची अहिल्या झाली. द्रौपदीला कृष्णानं वस्त्र पुरविली, पुराण ऐकताना नारदाचा नारदी झाली अन् साठ पुत्र देवून गेला. भगवान शंकर प्रसन्न झाले आणि रावणाला वरदान दिलं, कोणाच्या घरी ब्रह्मा, विष्णु-महेश बाळ होवून राहिले, भक्तिविजय ऐकताना विठ्ठल नामदेवाच्या हातचे भोजन करता झाला, जनीसवे दळण दळू लागला, चोखोबासवें विठ्ठलानं ढोरं आढली, एकनाथाच्या घरी कावडीनं पाणी भरलं. अशा नाना कथा आणि आख्यायिका यावर गाडगेबाबा विवेक जागृत ठेवून स्वतंत्र बुद्धीने माणसानं विचार करावा हेच शिकवित आहेत. धनगर जिकडं मेंढरं हाकतील, तिकडे ती जातील असं आजच्या काळात माणसाचं होता कामा नये. प्रत्येकानं सद्सद्विवेक बुद्धी जागृत करून विचार करावा आणि मगच त्याचा स्वीकार करावा. हे गाडगेबाबांना यातून सांगायचे आहे. हे आपण ध्यानात घेतले पाहिजे. वेळीच विचार केला पाहिजे. समजून घेतलं पाहिजे. जो मतितार्थ समजून घेईल त्यालाच यश येईल, बाकी सारे माना डोलवत परंपरेनुसार जीवन जगतील. ज्याचे त्यानंच पाहावं हेच गाडगेबाबांच्या विचारचं मर्म आहे.

● ● ●

२१. आई-वडिलांची सेवा करावी

गृहस्थी माणसाला गाडगेबाबा सतत सांगत की आपल्या आईबापाची सेवा केली पाहिजे. आपल्या म्हाताऱ्या आईबापांच्या खाण्यापिण्याची व्यवस्था केली पाहिजे. त्यांना औषधपाणी दिले पाहिजे. काही गृहस्थ आईबाप जीवंत असताना पाणी मागितलं तर पाणी देत नाही, जेवण मागितलं तर जेवण देत नाही. मेल्यावर मात्र त्याच्या अस्थी काशीला-रामेश्वरला नेतात, गंगेत शिरवतात. देव घडवतात अन् देव्हाऱ्यात ठेवतात, त्यास स्नान घालून गंध लावतात, त्यांना नमस्कार करतात. जीवंतपणी आईबापाच्या पाया पडत नाही उलट त्यांना लाथा मारतात. गाडगेबायाना

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

म्हाताऱ्या माणसांची मोठी दया यायची. त्यांच्या पोरांना ते म्हणत 'अरे आईबाप जीवंत असेपर्यंतच सेवा करा अन् पुण्य पदरी बांधा, मेल्यावर उगीच सेवेचा देखावा करू नका.'

गाडगेबाबांना म्हाताऱ्याकोताऱ्या माणसांचे हाल पाहावले नाही. एक म्हातारा ब्राह्मण काही इजा झाल्यामुळे झाडाखाली पाऊस पाण्यात यातना सहन करीत पडला होता. जाता येतांना लोक त्यास पहात पण कोणाला त्याची दया आली नाही. मरणोन्मुख स्थितीत बाबांनी त्याला आपल्या धर्मशाळेत आणले, त्याची उत्तम प्रकारे सुश्रूषा केली व प्रथम त्याच्यासाठी एक झोपडी बांधली व नंतर अशाच लोकांसाठी आणखी काही झोपड्या बांधून ठेवल्या व तेथे अशा म्हाताऱ्या व निराश्रित वृद्धांची त्यांच्या अंतकाळपर्यंत व्यवस्था केली. गाडगेबाबानं अशी वृद्धाश्रम काढलीत. ज्यास कोणी नाही त्यास गाडगेबाबान आसरा दिला.

आजच्य काळात म्हाताऱ्या आईबापाकडे अनेक ठिकाणी दुर्लक्ष होत असते. विभक्त कुटुंब पद्धती मोठ्या प्रमाणात अस्तित्वात आल्यामुळे असे होत आहे. ज्यांच्याकडे काही उत्पन्नाचे साधन आहे वा ज्याना काही पेंशन मिळते त्यांचे काहीतरी ठीक आहे परंतु ज्यांच्याजवळ कोणतेच उत्पन्नाचं साधन नाही त्यांची अतिशय वाईट अवस्था आहे. अशा काळात गाडगेबाबांचा उपदेश अधिक उपयोगाचा आहे. गृहस्थ हो, आपण आपल्या आईबापाची सेवा करू तर आपली मुलं आपली सेवा करतील नाहीतर आपलेही हाल असेच होतील हे विसरता कामा नये.

• • •

२२. देवी-देवतास नवस करु नयेत

काही लोक विशिष्ट देवतांचे स्वतःला भक्त समजतात आणि त्याच्या श्रेष्ठ-त्वाबाबत लोकांना कीर्तन-प्रवचनातून सांगत सुटतात, प्रत्यक्षात त्या खोट्या कंड्याच असतात. लोकांत भ्रम वाढवून आपली पोळी पिकविण्याची ही शक्कल काही लोकांची असते. संतांनी अशा कंड्या पिटवाणाऱ्याच्या विरोधात जन जागरण केले आहे. त्यांचाच धागा

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

गाडगेबाबांनी धरला होता आणि सतत सांगत राहिले.'' दगड-धोंड्यास शेंदूर लावून तो जर देव होत असेल व त्यांच्यात नवसास पावण्याचे सामर्थ्य येत असेल तर डोंगरास शेंदूर फासल्यास तो मोठा थोरला देव होईल आणि त्याच्यात नवसास पावण्याची शक्तीही मोठी येईल; परंतु असल्या दैवतांच्या अंगी नवसास पावण्याचे मुळीच सामर्थ्य नसते. देव कधीच नवसास पावले नाहीत व पावणार नाही. करिता कोणत्याच दैवतास कधीही नवस करू नयेत व जर कोणी केले असतील तर ते फेडण्याची सुद्धा जरूरी नाही.'' गाडगेबाबांचा हा हितोपदेश आजही उपयोगाचा आहे. आजही देवी-देवतासमोर कोंबडे-बकरे बळी देणारे अन् नवस फेडतो असे म्हणणारे लोक आहेत.

गाडगेबाबांने त्यांच्याकाळात पशुबळी देणाच्या विरोधात फार मोठी मोहीम उघडली होती. खंडोबा, बहिरोबा, म्हसोबा, भालोबा, मरीआई, सटवाई, बयाबाई, पीर, आसरा अशा देवीदेवतांपुढे हजारो बकरे-कोंबडे कापले जात होते तेथे कीर्तनकार, प्रचारक व गावकरी यांच्या मदतीने गाडगेबाबांने पशुहत्याबंदी केली.

वऱ्हाडात दरसाल दसऱ्याचे आदले दिवशी प्रत्येक गावातील महारपुऱ्यात, मातीची इनाई देवी करून, तिचेसमोर रेड्याचा छळ करून त्यास बळी देण्याचा प्रघात होता. या प्रघाताला आळा बसविण्याचे कार्य गाडगेबाबांनी केले आणि रेडाबलिदान विधी बंद केला.

त्याचसोबत गोहत्याबंदी करण्याचा प्रयत्न काही गावात गाडगेबाबा व त्याचे सहकारी यांनी केला. तद्वतच बैलाच्या शर्यती ज्याला 'शंकरपट' म्हणतात. हा शंकरपट भरविण्याचा आणि बैलांना तुतारीने (आरुने) टोचण्याचा प्रघात होता त्याचेही प्रमाण गाडगे- बाबांच्या कीर्तनातील उपदेशामुळे कमी झाले.

अशा या बलिदानबंदीचा फार मोठा इतिहास आहे. गाडगेबाबा व त्यांच्या सहकाऱ्यांवर त्या काळात क्रूर, दुष्ट, हिंसक लोकांकडून अनेक संकटे आणली गेली. खूप विरोध झाला परंतु गाडगेबाबा व त्यांचे राजाराम पाटील, महानंद स्वामी, शंकरराव वंजारी, संपतराव पाटील, कैकाडी महाराज, शंकरराव चाकणकर, झेबुजी पाटील, कुशाबा तनपुरे अशा शेकडो कार्यकर्त्यांनी हिंसाबंदीची चळवळ मोठ्या जिद्दीनं राबविली आणि फार मोठ्या प्रमाणात पशुहिंसा बंद

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

झाली.

गाडगेबाबानं संतांचा अहिंसेचा संदेश घरोघरी पोहचवला. नवस करणं बंद करायला लावलं, हजारो पशुपक्ष्यांचे जीव वाचवले.

अजूनही काही लोक नवस करतात, कंदुरी देतात त्यांनी गाडगेबाबांच्या संदेशावर विचार करावा अन् निरपराध जीवांची हत्या करू नये. डोक्यातून नवसबाण्याचा विचार काढून टाकावा हाच गाडगेबाबांचा विचार जनमनात रुजवायचा आहे.

● ● ●

२३. दया हाच धर्म

दुःखीकष्टी माणूस दिसताच गाडगेबाबाचं मन अतिशय द्रवत असे. त्यांच्या भावनाच उफाळून येत, त्यांचे हात पुढे होत अन् प्रत्यक्ष कृतीच करून जात. प्राणीमात्रावर दया करा हा धर्माचा संदेश जगभऱ्यातील सत्पुरुषांनी दिलेला आहे; गाडगेबाबांनं त्याच संदेशाच पालन केलं. ते आधुनिक एकनाथच होते. अमरावती येथील एकं प्रसंग आहे. उन्हाळ्याचे दिवस होते, दोन प्रहरची वेळ होती. उन्हाचा भयंकर कहर होता. अशावेळी गाडगेबाबा व संपतराव पाटील अंबा दरवाजाकडून कासार गल्लीकडे जात होते, तितक्यात त्यांना मरणोन्मुख स्थितीत पडलेले गाढव दिसले. त्याची हालचाल बंद झाली होती. बाबा त्याचेजवळ गेले, त्याचे दुःख पाहून त्यांचे मन द्रवले, त्याची दया आली. बाबा व संपतराव यांनी त्या मुक्या प्राण्यास उचलून सावलीत नेले, बाबांनी संपतरावांना पाणी आणण्यास पाठवले आणि पाणी आणताच पाच-सहा गडवे पाणी त्या गाढवाच्या मुखात टाकले, अंगावर शिंपडले. थोड्या वेळाने गाढव सावध होऊन उभे राहिले व माणसांची गर्दी पाहून पळून गेले.

गाडगेबाबांना जेव्हा अंध, पंगू, अपंग माणसं भीक मागताना दिसत तेव्हा त्यांचं मन भरून येई आणि यांच्यासाठी काही केलचं पाहिजे म्हणून त्यांनी अंधपंगूसाठी सदावर्त उघडले. ही सदावर्त अंध, पंगू, रोगी, महारोगी, लुले, थोटे अशाच लोकांसाठी होती. धडधाकट, भिक्षेचा धंदा करणारे, साधुबैरागी अशांना तिथं घासभर अन्नही मिळायचे नाही. गाडगेबाबांचा फुकट खावू लोकांवर

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

मोठा कटाक्ष होता. अशी माणसं सदावर्तात दिसली तर त्यांना हात धरून बाहेर काढून देत.

गाडगेबाबांनी अंध–पंगू ,निराश्रीत स्त्री–पुरुषांना कपडे वाटले, भांडी दिली. अनाथ बालिकाश्रम चालविले, धर्मशाळेत मोफत दवाखाने उघडले, भाकड गाई कसाबाचे घरी जावू नये म्हणून गोरक्षण संस्था स्थापन केली. जीवदया संस्था उघडली. पंढरपूर, आळंदी, देहू, नाशिक, ऋणमोचन, त्र्यंबकेश्वर, पुणे अशा कितीतरी तीर्थक्षेत्रात धर्मशाळा लोकदेणग्यातून उभारल्या आणि हजारो गोरगरीब, दीनदलित लोकांची राहण्याची सोय करून दिली. यास इतिहासात तोड नाही.

गाडगेबाबा हे दयेचे मूर्तिमंत प्रतिकच होते. कोणी मोळी घेवून जात असला, त्या ओझ्यानं थकला असला तर गाडगेबाबा ती मोळी आपल्या डोक्यावर घेत आणि इष्ट स्थळी पोहचून देत. कुठं गाईगुरे विहीरीसभोवतालचं साचलेलं घाणेरडं पाणी पीत असली, तर गावात जावून पोहरा दोर आणून, स्वतः पाणी काढून त्या गाईगुरांना पाजत. एखाद्याची गाडी चिखलात रुतली तर स्वतः हातभार लावून गाडी चिखलातून काढतं. कोणाचं मूल भर उन्हात पायी जात असलं तर त्यास चटकन कडेवर उचलून घेत. त्यांच्या रोमारोमात दयाभाव भरला होता. गाडगेबाबा सुशिक्षित श्रीमंतबायांना म्हणत ''भांडे उटणाऱ्या बाया तुमच्या घरी भांडे उटतात त्यांची दया येवू द्या, तिला गहू नका देऊ, जवारीचं पीठ द्या, तूप नका देऊ, तेल द्या. नवं लुगडं नका देऊ, जुनं लुगडं द्या. काही परुपकार करा. गरीबाची दया येवू द्या. दया हाच धर्म आहे.''

● ● ●

२४. बायांचा देव घरात आहे

गाडगेबाबा हे गृहस्थाश्रमी होते. त्यांची पत्नी कुंताबाई. त्यांचा विवाह त्याकाळच्या प्रथेनुसार वयाच्या १४–१५ व्या वर्षीच झाला होता. त्यांना दोन मुली व एक मुलगा होता. गाडगे–बाबानं वयाच्या २९ व्या वर्षी गृहत्याग केला. त्यानंतर बारा वर्षे परिभ्रमण करीत राहिले. त्याकाळात त्यांचे कुटुंब मामाच्या आश्रयाने दापुऱ्यास राहात

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

होते परंतु पुढे सौ. कुंताबाई ऋणमोचन, आमला येथे काही काळ झोपडी करून राहात होत्या. त्यानंतर धर्मशाळा बांधण्याचे काम सुरु असे. त्या परिसरात झोपडी करून राहायच्या. चार-सहा महिन्यातूंन एखादे दिवशी गाडगेबाबा थोडा वेळ जायचे, बाकी काळ ते बाहेरच राहायचे.

गाडगेबाबाचा स्त्री विषयक दृष्टीकोन पारंपारिक होता. ते कीर्तनातून म्हणायचे ''बायांनो हो, नवरा तीर्थाला जाईल, जाऊ द्या. नवऱ्याचा देव डोंगरात असील. पण तुमचा देव घरात आहे. आपापल्या नवऱ्याची सेवा करा. दररोज नवऱ्याच्या पाया पडा.'' हा विचार ऐकून पुरुषांना आनंद व्हायचा. पण गाडगेबाबा पुन्हा सांगायचे '...पण नवऱ्याच्या अंगात देवाचे गुण पाहिजेत' हे विसरू नका. जर दारू पिऊन आला अन् घरात ओकला..... असा नवरा असेल त्या बायकोनं त्या नवऱ्याची महापूजा करावी. गरम-चुलीतली राख टोपल्यात भरा अन् त्याच्या तोंडात टाकून द्या व घे म्हना तुझी महापूजा !

यावरुन गाडगेबाबा स्त्रीयांना शांत व कठोर भूमिका प्रसंगानुसार घेण्यास सांगत असत. त्यांनी बालविवाहाला कडाडून विरोध केला. होता तसेच बारा वर्षाची वधू अन् पन्नास वर्षाचा वर अशा विवाहाने महिलांचे कसे हाल होतात याचे लोकशिक्षण गाडगेबाबांनी त्यांच्या काळात दिले होते. आज काळ बदलला असला तरी गाडगेबाबांचा स्त्री विषयक विचार आजच्या समाजालाही विचार करायला लावतो आहे यात शंका नाही.

● ● ●

२५. देवाच्या मूर्तीसमोर पैसे-फळं ठेवू नका

आपल्यापैकी अनेकजण देवळात जातात. अन् देवाजवळ पैसे ठेवतात, नारळ फोडतात वा काही फळ त्याचे समोर ठेवतात. गाडगेबाबा म्हणत 'तुम्ही देवाला पैसे देता? किती देतो? खिशात दहा दहाच्या, शंभर-शंभरच्या नोटा असल्या तरी दहा वीस पैसे, फार झालं तर रुपया-दोन रुपये देवाजवळ ठेवता. हा देवाचा अपमान आहे नव्हे आपलाच मूर्खपणा आहे. देवाजवळ ठेवलेला सारा पैसा पुजाऱ्याच्या घरी जातो, कपडा- लत्ता हा बाजारात विकला जातो किंवा पुजाऱ्याचे कुटुंब वापरतात अन् त्या फळावर पुजारी ताव मारतो. देवाजवळ पैसा ठेवण्यापेक्षा अंध, पंगू,

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

निराधाराला मदत करा, कुष्ठरोग्याला द्या. रुग्णाच्या औषध- पाण्यासाठी द्या. फळ असतील तर मुलांना वाटा.

देव हा पैशाचा भूकेला नाही, देव हा प्रेमाचा भूकेला आहे. देव त्या दीनदलितात, गोरगरीवात पाहा. हेच गाडगेबाबाच्या तत्वज्ञानाचं सूत्र आहे.

• • •

२६. दुर्व्यसनापासून दूर राहा

आजच्या स्वतंत्र भारतात बिडी- सिगारेट, गांजा-दारु, लॉटरी - सट्टा याना महत्व आलेले आहे, मोकळ्या मनानं यांचा उपभोग घ्या असाच जणु आदेश आहे. त्याचे दुष्प- परिणाम नव्या पिढीच्या आरोग्यावर अन् आर्थिक स्थितीवर दिसत आहेत पण आमचे डोळे उघडत नाही. गाडगेबाबानं पन्नास-पाऊणशे वर्षापूर्वीच या व्यसनांचा धिक्कार केलेला आहे. दारु पिऊन आलेल्या नवऱ्याला बडवण्याचा उपदेश गाडगेबाबा करून गेले. दारुड्या बापाला बडविल्याबिना सोडूच नका. त्याची भीड करू नका, बडवाल तर बडवा. आणखीन पोलीसाच्या हातात द्या. असे गाडगेबाबा मुलांना सांगत. दारुच्या व्यसनामुळे बहुजनसमाजाचे कसे हाल झाले याचे चित्र गाडगेबाबा कीर्तनात रंगवत ते म्हणत-‘मारवाडी दारू पिऊन बंबईत पडला पाहिला का ? ना ऽऽ ही. गुजराती दारु पिऊन बंबईत पडला पाहिला का ? नाऽऽही ब्राह्मण दारु पिऊन कचेरीत पडला पाहिला का ? नाऽऽही. जे जे दारू पितील त्यांचा खानाखराबा झाल्याविना कधी राहणार ना ऽऽ ही !

सध्या गावागावातील लोक मोठ्या प्रमाणात दारुचे आहारी जात आहेत. त्याचे दुष्परिणाम आर्थिक परिस्थितीवर दिसत आहेत. अनेकांचे जीवनच खालावत आहे, अधोगतीला जात आहे तरी अजूनही जाग येत नाही. आतातरी गाडगेबाबाचं आपण ऐकू या !

• • •

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

२७. इंद्रिय नाही मन दंडलं पाहिजे

माणसाचं मन मोठं चंचल असते. ते कधी विचाराकडे घेवून जाते तर कधी विकाराकडे धाव होते. सामान्य माणसाचं मन स्थिर होतच नाही. गाडगेबाबानं जगातील हजारो माणसं पाहिली होती. गावातली अन् शहरातली तर पाहिलींच, पण रानावनात राहणारे भटक्या जमातीचे आदिवासी लोकही पाहिले होते. शेतकरी–व्यापारी–पुजारी यांच्याही मनाच्या वृत्त्यांची जाण त्यांना होती. तीर्थयात्रेत तर नाना प्रकारचे वेषधारी साधु त्यांना भेटले होते. एवढेच नव्हे तर त्यांचे अनुयायी म्हणणारे कितीतरी बुवा त्यांच्या भोवताल असायचे. कोणी लुंगी नेसत, कोणी डोक्यात टोपरच ठेवत, कोणी लंगोटीच लावीत, कोणी सदराच घालत नसे, कोणी उपासच करी, कोणी मौन पाळी, कोणी जागेच राहात, गाडगेबाबा प्रत्येकाला काही ना काही विचारित असत. मग ते आपल्यापरीनं उत्तर देत. देहइंद्रिये ताब्यात राहावी त्यासाठी म्हणे 'आम्ही हे व्रत घेतलं आहे.' एका अनुयायानं एकदा पायात लोखंडाची बेडीच अडकवली. गाडगेबाबाचे लक्ष त्याचेकडे गेले. त्यांनी सहजपणे विनोदाने विचारालं 'कोठी दरोडा घातला बाप्पा ? त्यावर तो लाजला अन् म्हणाला. ''दरवडा नाही घातला बाबा, इंद्रियांवर विजय मिळावा म्हणून मी व्रत घेतलं आहे. गाडगेबाबा त्याला म्हणाले 'अरे बाबू, इंद्रियाना दंडल्यानं काय होते ? दंडलं पाहिजे मन.

गाडगेबाबाच्या तत्वज्ञानात मन काबूत ठेवण्याला महत्वाचं स्थान आहे. बाबानं आपलं मन इकडे तिकडे कधी भटकूच दिलं नाही. गृहत्याग केल्यावर मागं फिरून पाहिलं नाही. हातावर भाकर घेवून खायचं व्रत कधी बदलवलं नाही, हातातला खराटा कधी सोडलाच नाही, अन् कीर्तन केल्याशिवाय दिवस गेलं नाही. चिंध्याचा वेष बदलविला नाही. ही सारी दंडलेल्या मनाची किमया होती.

• • •

२८. कुष्ठरोग्याची सेवा करा

गाडगेबाबांचं मन मोठचं हळवं होतं. कोणाचं दुःख दिसताच त्यांना कळवळा यायचा. कुष्ठरोगाची दशा पाहून त्यांना अतिशय कळवळा येत असे म्हणून ते

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

अमरावतीला आले की तपोवनातल्या जगदंबा कुष्ठधामात अवश्य जायचे. डॉ. शिवाजीराव पटवर्धन या थोर मनाच्या सत्पुरुषानं कुष्ठ रोग्याची जीवनभर सेवा केली. ते त्यांच्यासाठी जगले अन् त्यांच्यासाठी सेवा करीत करीत देवाघरी गेले. वर्धा शहराजवळच्या मनोहर दिवानने सुरु केलेल्या दत्तपूर कुष्ठधामात गाडगेबाबा अनेकदा गेले. अचलपूरच्या कुष्ठकेंद्रात गेले, आंभोऱ्यासही गेले. तेथे जावून मिसळले.

कुष्ठरोगी हे पंढरपूर, आळंदी, नाशिक अशा तीर्थक्षेत्रात मोठ्या प्रमाणात जमतात हे गाडगेबाबांनी पाहिलं होत म्हणून त्यांच्यासाठी त्यांनी सदावर्ते सुरु केली होती. गाडगेबाबा अन् मेहेरबाबा हे नगरला कितीदा तरी कुष्ठरोग्यांना स्नान घालीत असत, त्यांना जेवू घालीत असत, त्यांना कपडालत्ता देत असत.

आपल्यासोबत असलेल्या बुवा लोकांनी कुष्ठसेवा करावी असे गाडगेबाबांना वाटत असे म्हणून ते एखाद्या कुष्ठरोग्याला काखेत धरून नदीच्या पात्रात आणत अन् स्वतः त्याचे हात पाय धुवून देत, पाठ घासून देत अन् त्यांच्या सोबतच्या अनुयायाला पाणी टाकायला सांगत, त्यालाही कुष्ठरोग्याचे पाय घासायला सांगत. पण बहुतेक अनुयायांना कुष्ठरोग्यापासून दूरच राहावेसे वाटे. कुणीच कुष्ठसेवेच काम हाती घेतलं नाही. गाडगेबाबाचं हे कार्य अपुरचं राहिलं. कुष्ठरोग्यांची सेवा अन्य कोण्या कीर्तनकारानं केल्याचं ऐकायला येत नाही.

• • •

२९. कोणतेही काम कमी दर्जाचे नाही

गाडगेबाबांना कोणतेही काम कमी दर्जाचे वाटले नाही. संडास साफ करण्याचे काम असो, बांधकाम असो, झाडझूड असो हिशोबाचे काम असो, पत्र लिहून घेण्याचं काम असो, भाषणाचे असो वा कीर्तनाचे असो. सर्वच कामात बाबांना सारखाच रस, सर्वच कामात सारखीच तन्मयता, सारखीच एकाग्रता. त्यांचे सर्वांना सांगणे होते की कोणतेही काम कमी दर्जाचे नाही. जशी वेळ पडेल तसे काम हाती घ्या. कोणी ऐकलं नाही, ध्यान दिलं नाही तर गाडगेबाबाचे हात पुढे होत. पुण्याच्या धर्मशाळेतील एक प्रसंग येथे देत आहे. एकदा एका सेवकाला बाबाने सांगितले की तू या धर्मशाळेसमोरचा एवढा परिसर झाडून काढ अन् मग ते संडासही साफ करून घे.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

त्यावर तो सेवक म्हणाला– 'बाबा, मी हे सर्व झाडून घेतो पण संडास नाही साफ करणार.'

बाबा स्वतःच उठले, संडास घराजवळ गेले आणि स्वतः पाणी आणून संडास साफ धुवून काढले व त्या सेवकाला म्हणाले–' अरे बाबा, तुमच्याही पोटांत तेच आहे.' गोपालकृष्णाने घोडाला खरारा केला, गाईचे शेण काढले, गाईचे दुध काढले आणि दुष्टांचे परिमार्जन करण्यासाठी हाती सुदर्शन चक्रही घेतले. गाडगेबाबाच्या तत्वज्ञानाची ही दृष्टी होती प्रसंगानुसार आपला विवेक जागृत करावा अन् कोणतेही काम कमी दर्जाचे समजू नये.

● ● ●

३०. त्यागापाशीच त्याग येतो

आपण दैनंदिन जीवनात पाहात असतो की गाईजवळच गाय जाते, चिमणी – जवळ चिमणी जाते, मुंगीजवळच मुंगी जाते, निसर्गात हा नियम सर्वत्र आढळतो, तसेच सोन्याला सोन्याच आकर्षण असते, चांदीला चांदीच अन् लोखंडाला लोखंडाचं आकर्षण. तसचं विकारी माणसाला विकारी माणसाचं अन् विचारी माणसाला विचारी माणसाचं आकर्षण असते. गुण गुणाकडे धाव घेई या सिद्धांताची गाडगेबाबांना चांगलीच जाण होती अन् तसा त्यांचा अनुभवच होतो. गाडगेबाबा हे त्यागी महात्मा होते. त्यांचा त्याग पाहून त्यागमूर्ती गणपतराव गांगण त्यांच्याकडे आकर्षित झाले, राजाराम पाटील, घोंगडे नेसून राहणारे महान त्यागी घोंगडेबुवा त्यांच्याकडे आकर्षित झाले. त्यागी महापुरुष महानन्द स्वामी बाबांच्या खात्यात जमा झाले. शेलारमामा, नारायण– राव माळी, रामदास आमटे, बबनराव कळसकर, लक्ष्मण पाटील, संपतराव पाटील. ओंकार जोशी, यशवंतराव शिंदे, यशवंतराव भंडारी, मीराबाई शिरकर, अच्युतराव देशमुख, गुणवंतराव चऱ्हाटे, कैकाडी महाराज असे कितीतरी त्यागी साधुवृत्तीच्या व्यक्ती गाडगेबाबांकडे आल्या आणि जीवनभर त्यांच्या कार्यात राहिल्या. गाडगेबाबांचे वैराग्य पाहून, त्यांची त्यागवृत्ती, निष्काम सेवा पाहून मुंबई–पुणे, नागपूर–अमरावतीचेच नव्हे तर हैद्राबाद, म्हैसूर, बिकानेर, बडोदे, मद्रास, अहमदाबाद, कराची, कारवार अशा दूरदूरचे दानशूर गाडगेबाबांकडे मोठमोठ्या रकमा घेवून आले अन् मोठमोठ्या धर्मशाळा,

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

वसतिगृह, गोरक्षण, अनाथाश्रम, वृद्धाश्रम, शाळा-महाविद्यालय आकाराला आलीत. जणु देवच त्यांच्याकडे दानदात्यांना पाठवित आहे असेच सामान्य माणसाला वाटले. गाडगेबाबाकडे हे दान, हे धन माणसातलाच देव पाठवित होता. गाडगेबाबांच्या त्यागाचा एवढा प्रभाव पडायचा की त्यांना शेट-सावकारांना बोलायचं कामचं पडत नव्हत, ते स्वतःहून त्यांचेकडे यायचे अन् आमची ही रक्कम घ्या, आमच्यातर्फे सदावर्त चालवा, आम्ही यासाठी धान्य पाठवितो, कपडे पाठवितो, विटा पाठवितो, सिमेंट पाठवतो असे म्हणायचे आणि पाठवायचे. त्यागी व्यक्तीकडे त्याग करणारे धावतात हेच तत्व गाडगेबाबांनी शिकवलं. आधी तुम्ही तयार व्हा मग सारं जग तुमच्या मागं धावते हे लक्षात ठेवा. स्वतःच्या अनुभवातून गाडगेबाबा आम्हास हे तत्वज्ञान सांगत होते. ते तत्वज्ञान आपण समजून घेवून त्यावर विचार करून आचरणात आणले पाहिजे. तरच आपल्या जीवनात यश मिळेल.

● ● ●

गाडगेबाबांच्या तत्वज्ञानाचे सार

१) कर्मयोगी गाडगेबाबा हे विसाव्या शतकातील एक महान संत होते. त्यांना सगुणदेव मान्य होता परंतु तो देव ते कर्तव्यशूर माणसात पाहात होते; दगडाच्या मूर्तीत ते पाहात नव्हते. त्यांना निर्गुण निराकार ईश्वर मान्य होता पण तो निसर्गाच्या स्वरुपात आहे. निसर्गाचे नियम तेच ईश्वराचे नियम आहेत. म्हणूनच ते हातात झाडू घेवून निसर्गात प्रदूषण होवू नये, त्या निसर्गरूपी ईश्वराची सेवा करीत होते.

२) देवाचं भजन केल्याने मनुष्य देव होतो. येथे भजन म्हणजे केवळ तबला-पेटी-टाळांच्या गजरात देवाची स्तुतीस्तोत्रे गात बसणे असा मर्यादित अर्थ गाडगेबाबांना मान्य नव्हता. भजनासोबत भोजनाची व्यवस्था अर्थात भक्ती आणि निष्काम कर्म यांचा संगम त्याना हवा होता.

३) गाडगेबाबांना विद्या हे मोठं धन आहे असे वाटत होत. अज्ञान अंधः-कारातून बाहेर पडून विवेकाचा मार्ग धरून स्वतंत्र विचाराने जीवन जगण्याचा अन् कीर्तिरुपाने अमर राहण्याचा संदेश देत आहेत.

४) जसे कर्म तसे फळ हा सिद्धांत गाडगेबाबांच्या तत्वज्ञानात प्रामुख्याने

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

दिसून येतो. पेराल तेच उगवेल हे कधीही विसरता कामा नये. हाच गाडगेबाबाचा हितोपदेश सर्व मानवजातीला आहे.

५) संसारात जमाखर्च ठेवाल, काही भविष्यासाठी बचत कराल तरच सुखाचे जीवन जगाल नाहीतर आर्थिक गुलामगिरी आल्याशिवाय राहणार नाही. हे गाडगेबाबानं प्रत्येक कुटुंबाला, गावाला अन् देशाला अतिशय काकुळतीने सांगितले आहे. कधीही कर्ज काढू नका अन् कर्जाच्या ओझ्याखाली कोणापुढे झुकू नका. हाच त्यांचा संदेश आहे.

६) या विश्वात फक्त स्त्री-पुरुष ह्याच दोन जाती आहेत. तिसरी जातच नाही म्हणून भेदाच्या कृत्रिम भिंती पाडून टाका आणि आम्ही सारे समान आहोत. हा समतेचा, समाजवादाचा अन् साम्यवादाचा विचार म्हणजेच गाडगेबाबाचे तत्वज्ञानाचे सार होय.

७) अस्वच्छता हेच सर्व रोगाचे मूळ होय. प्रदुषित वातावरणामुळे शारीरिक रोग होतात व मनातील प्रदुर्षणानं मानसिक रोग होतात. हे कुणीही, केव्हाही विसरता कामा नये. पर्यावरण अंतरातलं अन् बाहेरच निर्मळ राहण्यासाठी हातात झाडू घ्या अन् मनात विवेक अर्थात सद्‌बुद्धी जागृत ठेवा.

८) धनगराच्या मेंढरासारखे मान हालवत जिकडे हाकतील तिकडे रानावनात फिरु नका तर स्वतंत्र बुद्धीने विचार करीत जीवनाची वाटचाल करा हेच गाडगेबाबांना साऱ्या मानवसमाजाला सांगायचे होते.

९) अंधश्रद्धेपासून, देवी-देव घुमाऱ्यापासून व नवस बाण्यापासून प्रत्येकानं दूर राहिलेच पाहिजे. या लोकात भ्रम पसरविणाऱ्यांना विरोध करावा अन् त्यांचा मार्ग रोकावा. गाडगेबाबानं आयुष्यभर हेच प्रबोधन केले.

१०) दया हाच धर्म आहे म्हणून गोरगरीब-दीनदलितांना सहकार्याचा हात द्या आणि आपल्यासह सर्वांचे जीवन उन्नत करा.

११) शेवटच गाडगेबाबांच्या तत्वज्ञानाच सूत्र आहे की सरळपणाचे जीवन जगा व व्यसनापासून दूर राहा. स्वतःच्या पायावर स्वतःच्या कर्तृत्वानं उभे राहा अन् आनंदात जीवन जगा.

गाडगेबाबांच्या तत्वज्ञानानुसार जीवन जगलात तर ऐहिक व परमार्थिक उन्नती निश्चितच होईल. साऱ्या विश्वात सुख-समृद्धी व शांतीचे राज्य नांदेल.

॥ गोपाला गोपाला देवकीनंदन गोपाला ॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

अन्य तत्वचिंतकांसोबत

गाडगेबाबांचा संबंध त्यांच्या धगधगत्या त्यागानं जसा गोरगरीबांशी आला तसाच त्यांच्या त्यागाचा अनेक भारतीय तत्वचिंतकांवर प्रभाव पडला. काही निवडक तत्वचिंतक महा- पुरुषांच्या व मान्यवरांच्या भेटीचा संक्षिप्त वृतांत येथे देत आहे.

गाडगेबाबा व महात्मा गांधी

श्रीक्षेत्र पंढरपूर येथे चोखामेळा या नांवाची अस्पृश्य समाजा- साठी पन्नास हजार रुपये किंमतीची धर्मशाळा महाराजांनी बांधिली आहे. त्या धर्मशाळेची व्यवस्था हरिजन-सेवक-संघाकडे द्यावी या हेतूने नामदार बाळासाहेब खेर यांचे मार्फत पत्रव्यवहार केला. पत्रव्यवहारावरून पांडुरंग बाळाजी कवडे, नांदगांव हे स्वामी आनंद, ठाणा ह्यांच्यासह वर्धा येथें महात्माजींच्या भेटीस गेले. महात्माजी महाराजांस नांवाने ओळखीत असून त्यांच्या कार्याबद्दल त्यांना बरीच माहिती असल्याचे भेटीत दिसून आले. महाराजांच्या भेटीची महात्माजींनी इच्छा दर्शविली व महाराजांची भेट शक्य तितकी लवकर होण्याबद्दल सांगितले. त्याप्रमाणे तारीख २७/११/१९३५ रोजी वर्धा येथे महात्माजी व महाराज यांची दुपारी ३ वाजता भेट झाली. धर्मशाळेबद्दल प्रश्नोत्तरे झाल्यावर इतर विषयांवर कांही वेळ बोलणे झाले. सायंकाळी जेवणासाठी शेजारी बसण्याबद्दल महात्माजींनी आग्रह केला. परंतु महाराज अंगणांत जमिनीवर बसले; शेवटी महात्माजींनी समोरच्या ओट्यावर बसण्यास सांगितले. सौ. कस्तुरबाई (महात्माजींच्या पत्नी), महात्माजींचे चिरंजीव रामदास व स्वामी आनंद, ठाणा यांना महाराजांच्या जेवणाची व्यवस्था पाहाण्यास सांगितलें. तेल, तिखट, कांदा व भाकरी यांच्याबरोबर महाराजांनी जेवण केले. हे पाहून महात्माजींस विशेष समाधान वाटले. ''गोरगरीब व शेतकरी दररोज जे अन्न खातात, तेच अन्न महाराज खात आहेत.'' असे उद्धार महात्माजींनी काढले. जेवणानंतर महाराजांनी हातांत खराटा घेऊन झाडझूड केली. रात्रींची प्रार्थना झाल्यावर कांहीतरी सांगा असा महात्माजींनी आग्रह केला. त्याला श्रीमंत दे. भ. जमनालालजी यांनीही दुजोरा दिला. महाराजांनी श्रीतुकाराम आदि संतांच्या वाणीचा आधार घेऊन धर्म व चालू परिस्थिति यावर अर्धा तास भाषण केले. ते

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

महात्माजींस व इतर मंडळीस फारच आवडले. नंतर स्टेशनवर जाण्यासाठी महाराज निघाले. महात्माजी म्हणाले, 'तुम्हांला तीन दिवस जातां येणार नाही.' महाराजांनी सांगितले 'मी गेलो नसतो; पण ता. २९/११/३५ रोजी परभणी (निजाम स्टेट) जिल्ह्यांत कीर्तन ठरले आहे. हजारो लोक येतील व परत जातील. याकरितां जाणे जरूर आहे.' रात्री नऊ वाजतां महाराज स्टेशनवर आले. महात्माजींच्या आश्रमांत महाराज सुमारे सहा सात तास होते. दोन तेजस्वी विभूतींची भेट, पवित्र अंतःकरणांतून जगकल्याणास्तव निघालेले उद्‌गार व भेटीचा एकंदर देखावा अपूर्व असा होता. या भेटीच्या वेळी श्रीस्वामी आनंद, ठाणा व कवडे, नांदगांव असे उभयतां हजर होते. (संदर्भः श्रीसंत गाडगेबाबा ले. पांडुरंग कवडे पृ. क्र.१६४)

वैराग्यमूर्ति गाडगेबाबा व राष्ट्रसंत तुकडोजी

प्रथम भेट

गाडगेबाबा अन् तुकडोजी महाराज यांची प्रथम भेट कुठे झाली हे निश्चितपणे सांगणे कठीण आहे कारण ना कुठे गाडगेबाबांच्या प्रवासाच्या नोंदी, ना वं. राष्ट्रसंतांच्या भजनाच्या अन् भ्रमणाच्या तारीखवार डायऱ्या. १९४८ नंतर 'समर्थ डायरी' नावाची जमाखर्चाची वं. राष्ट्रसंतांची दैनंदिन लिहिली जात होती. परंतु काळाच्या ओघात सर्व डायऱ्यांची जपवणूक झालेली नाही. ठोकळमानाने गाडगेबाबा आणि तुकडोजी महाराज यांची प्रथम भेट १९३० साली पंढरपूर क्षेत्री झाली असा माझा अंदाज आहे. गाडगेबाबांचं कीर्तन होतं. गाडगेबाबा कीर्तनास उभे झाले पण पखवाज वाजविणारा योग्य माणूस हजर नव्हता, हे पाहताच तुकडोजी महाराज पुढे आले व त्यांनी कीर्तन संपेपर्यंत पखवाज वाजविला. गाडगेबाबानं तुकडोजी महाराजांची ओळख श्रोत्यांना करून दिली, त्यामुळे पंढरपूर क्षेत्री तुकडोजी महाराजांचा मान वाढला. तेव्हापासून या दोन महान संतांचे परस्पर प्रेम वाढत गेले.

भेटीगाठी व कीर्तन

१९३५ सालच्या सालबर्डी रुद्रयाग महायज्ञात गाडगेबाबा उपस्थित होते याची नोंद सालबर्डी रुद्रयाग अहवालात आहे. २० नोव्हेंबर १९३५ रोजी समर्थ सद्‌गुरु श्रीआडकोजी महाराज यांच्या पुण्यतिथीचे दिवशी गाडगेबाबा

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

अचानक वरखेडला आले आणि त्यांचे वरखेडला कीर्तन झाले. श्रीक्षेत्र पंढरपूर येथेही गाडगेबावा व तुकडोजी महाराज यांच्या भेटी होत असत. १९४९ च्या गुरुकुंजातील प्रथम गांधी स्मृतिदिनी गाडगेबाबांचे कीर्तन १२ फेब्रुवारीला गुरुकुंज आश्रम परिसरात झाले होते. त्यानंतर नागपूर, आमगाव, वडीबाजार येथील गांधीस्मृती समारोहात गाडगेबाबा उपस्थित होते, त्यांनी कीर्तन केले होते. आपला खराटा परिसरात चालविला होता. याची नोंद आढळते.

संत संमेलनात

वं. महाराजांनी पंढरपूरक्षेत्री १९४८ पासून दरवर्षी संत संमेलनं आयोजित केली होती, १९५५ पर्यंत सतत सात वर्षे ही सम्मेलन झालीत. त्या प्रत्येक सम्मेलनात गाडगेबाबा आपले चार शब्द सांगत असत. त्यांची दोन भाषणे श्रीगुरुदेव मासिकात वाचायला मिळतात. तीच दोन भाषणे गाडगेबाबांची अंधश्रद्धा विरोधी चळवळ या माझ्या पुस्तकात दिलेली आहेत.

बलिदानबंदी चळवळीत

गाडगेबाबा व त्यांच्या अनुयायांनी कोंबडे बकऱ्यांचे बलिदान बंद करण्यासाठी फार मोठी चळवळ १९३० ते १९५२ पर्यंतच्या काळात राबविली होती. वं. महाराजांनीही बलिदानबंदीची मोहीम १९४५-४६ साली प्रकर्षाने यशस्वी केली होती. त्याच काळात गिरडक्षेत्री (ता. हिंगणघाट) गाडगेबाबा व राष्ट्रसंतांची भेट झाली होती. दोघांनीही तेथे पशुबलिदान बंदी व्हावी यासाठी खूप खटपट केली. वं. महाराजांचे त्या स्थळी भजन झाले. अस्पृश्यता निवारण कार्यक्रमातही या दोन्ही महापुरुषांनी अतिशय जिव्हाळ्याने आयुष्यभर प्रयत्न केले. देवळातला देव न पाहता माणसातला देव त्यांनी पाहिला व त्यांची सेवा म्हणजेच पूजा असा हितोपदेश केला. श्री गाडगे महाराज मिशन व श्रीगुरुदेव सेवा मंडळ या समविचारी संस्थांचे एकीकरण व्हावे यासाठी मुंबई येथील कॉंग्रेस हाऊसमध्ये गाडगेबाबांच्या उपस्थितीत ९ ते ११ फेब्रुवारी १९५४ रोजी सविस्तर चर्चा झाली होती. त्यानंतर नाशिक व मुंबईस पुन्हा विचार विनिमय झाला शेवटी दोन्ही संस्थांनी स्वतंत्रपणे कार्य करावे व वेळ प्रसंगी सहकार्य करीत असावे असे ठरविण्यात आले.

गाडगेबाबा १९५४ सालच्या जून महिन्यात आजारी होते तेव्हा वं.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

महाराजांनी त्यांना पत्र लिहिले होते.

॥ श्रीगुरुदेव ॥

श्री. पू.ह.भ.प. संत गाडगे महाराज यांना सप्रेम जयगुरु.

मुक्काम मोझरी
दि. ९-६-१९५४

ऐकलं आहे की आपली प्रकृती बरीच बिघडली आहे. कृपा करून आपण विश्रांती घेऊन नंतर कार्यक्रमाला गेलात तर, फार बरे होईल. आमच्या स्वार्थाने बोलावयाचे तर आपल्यासारख्या महान त्यागी, निःस्पृह व जनहितैषी सेवकाची आजच्या भारताला अत्यंत जरूरी आहे. महाराज आमच्या मृत्यूलोकांत तर काही अमरकीर्तीचे लोक असतील त्यात आपली जागा महत्वाची आहे. आपण जेवढे दिवस अधिक रहाल तेवढी ईश्वराची कृपा समजू. समाजात तोंडाची विद्वता सांगणारे लोक बहु आहेत पण हातात खराटा घेऊन, सडकेवर खाऊन लोकांचे हित करणारे लोक बोटावर मोजण्याएवढेही नाहीत तेव्हां आपण बिमार आहात असे कळले की, मन दुःखी होते. आम्ही आपले शिष्य वा संप्रदायी नसलो तरी आपल्या केलेल्या जनता-जनार्दनाच्या सेवेचे जे आपल्यात तेज, ओज व कळकळ आहे त्याचे आम्ही दास आहोत.

जे जे कोणी धर्माचे, परधर्माचे, जातीचे, बिजातीचे लोक हे कार्यवजा अधिकारी ठेवतील त्यांना आम्ही देवापेक्षाही मोठे मानू असा आमचा सिद्धान्त आहे. तेव्हा आपण अधिक दिवस मानवाची सेवा करावी व तसे उदंड आयुष्य ईश्वराने आपणाला द्यावे अशी देवाजवळ प्रार्थना आहे. श्रीक्षेत्र पंढरपूरला भेट होईलच. आपल्यां जवळील कळकळीच्या व आपल्या आज्ञेने सदैव वागणाऱ्यां लोकांचीही धन्य आहे.

सर्व मंडळींना माझा जयगुरु. -तुकड्यादास

गाडगेबाबांचे २० डिसेंबर १९५६ रोजी निर्वाण झाले. त्या दिवशी वं. महाराज भुसावळ येथे होते. ती बातमी समजताच त्यांनी अमरावतीला तार केली.- 'मी आल्याशिवाय अग्नि संस्कार करू देऊ नका'- आणि लगेच वं. महाराजांनी श्रद्धांजली गीत लिहिलं-

'सुनी खबर कि सन्त गाडगेबाबा हम को छोड गये।
धडक भरी छातीमें, हमको पलभर तो नहि होश रहे ॥'

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

गाडगेबाबांच्या एका पुण्यतिथी महोत्सवात वं. महाराजांनी त्यांचा गौरव मोजक्या शब्दांत केला आहे. ''आपल्या लोकांवर त्या निष्काम कर्मयोगी गाडगेबाबांचे फार उपकार आहेत. या सत्पुरुषानं लाखोंची संपत्ती मिळविली पण गाडगं सोडलं नाही....दीनदुःखितावर या महापुरुषानं अपार प्रेम केलं आहे. त्यातच त्यांनी देव पाहिला–गाडगेबाबा म्हणजे दुःखितांच्या सेवेचे कल्पतरु होते, त्यामागचे यज्ञकुंड होते, धैर्याचा हिमालय होते.

वं. राष्ट्रसंतांनी ग्रामगीतेच्या 'ग्रामशुद्धी' अध्यायात वैराग्यमूर्ती गाडगेबाबांना अढळ स्थान दिले आहे.

गाडगेबाबा व डॉ. बाबासाहेब आंबेडकर

गाडगेबाबांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कर्तृत्व अतिशय जवळून पाहिले होते. त्यांच्या विव्दतेबाबत त्यांना सार्थ अभिमान होता. हजारो वर्षापासून जे लोक झोपले होते त्यांना जागे करण्याचं, स्वतःची अस्मिता ओळखण्यासाठी उठविण्याचं, शिक्षणक्षेत्रात पुढे येण्याचं अन् संघटित करण्याचं बाबासाहेबाचं काम पाहून गाडगेबाबानं हे खरे दलितांचे बाबा आहेत असे मनोमन ठरवलं होतं. या दोघांची अनेकदा भेट झाली. चोखामेळा वसतिगृह त्यांनी बाबासाहेबांच्या स्वाधीन केलं. बाबासाहेबही अनेकदा गाडगेबाबांच्या कीर्तनात जावून बसत. गाडगेबाबा आपल्या कीर्तनात बाबासाहेबांच्या कार्याचा उल्लेख करीत. बाबासाहेब गेले त्या दिवशी गाडगेबाबांना अतिशय दुःख झालं.

गाडगेबाबा व भाऊसाहेब डॉ. पंजाबराव देशमुख

गाडगेबाबा व शिक्षण महर्षि भाऊसाहेब डॉ. पंजाबराव देशमुख यांच्याही अनेकदा भेटी झाल्या. गाडगेबाबा भाऊसाहेबांना 'शेतकऱ्याचा देव' असे संबोधत. त्यांच्या अमरावती येथील श्रद्धानंद वसतिगृहात अनेकदा जात, तेथला परिसरही स्वच्छ करीत.

गाडगेबाबा व कर्मवीर भाऊराव पाटील

गाडगेबाबा व कर्मवीर भाऊराव पाटील यांचे संबंध याची नोंद रयत शिक्षण संस्थेच्या इतिहासात आहे.

याशिवाय बाळासाहेब खेर, आचार्य अत्रे, प्रबोधनकार ठाकरे, गो. नी.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

दांडेकर, गणपतराव तपासे, चौंडे महाराज, मालोजीराव निंबाळकर अशा कितीतरी मान्यवरांना गाडगेबाबांचे कार्य पाहून अतिशय आनंद होई व ते बाबांना वंदन करीत असत. त्याशिवाय हजारो लोक त्यांचे नाव घेताच आजही नतमस्तक होत आहेत.

वाचक हो ! गाडगेबाबांच्या महानिर्वाणाला आता पन्नास वर्ष लवकरच पूर्ण होत आहेत. त्यांच्या कार्याची ध्वजा गतिशीलपणे फडकत ठेवण्याची जबाबदारी आपणा सर्वांवर आहे. गाडगेबाबा ज्या तत्वासाठी जीवन संघर्ष करीत राहिले, त्या तत्वाचे पाईक आपल्याला व्हायला हवे, नाही कां ?

समाप्त

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

गाडगेबाबांचा संदेश

भुकेल्यांना	-	अन्न
तहानलेल्यांना	-	पाणी
उघड्या नागड्यांना	-	वस्त्र
बेघरांना	-	आसरा
मुलामुलींना	-	शिक्षण
अंध पंगु रोग्यांना	-	औषध
बेकारांना	-	रोजगार
पशुपक्ष्यांना	-	अभय
दुःखी व निराशांना	-	हिम्मत

हाच आमचा रोकडाधर्म

हीच आमची खरी भक्ती

हीच आमची खरी देवपूजा

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi